महाराष्ट्र शासन

सशक्त आदिवासी, उज्ज्वल भविष्य...


# गाथा विकासाची



एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, यावल,
ता.यावल, जि.जळगाव

महाराष्ट्र शासन

# एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, यावल, ता.यावल, जि.जळगाव



सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# शुभेच्छा संदेश



**मा. श्री. देवेंद्र फडणवीस**
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

यावल आदिवासी प्रकल्प कार्यालयातर्फे तयार करण्यात आलेली ही डिजिटल यशोगाथा पुस्तिका हे आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी उचललेले एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. विविध शासकीय योजनांचा लाभ घेऊन आपले जीवनमान उंचावणाऱ्या लाभार्थ्यांच्या प्रेरणादायी कथा या पुस्तकातून समोर येतात. लाभार्थ्यांच्या मुलाखती आणि माहितीपूर्ण व्हिडिओ डॉक्युमेंट्री पाहण्यासाठी दिलेले स्कॅन बार कोड हा नाविन्यपूर्ण उपक्रम असून तंत्रज्ञानाच्या माध्यमातून पारदर्शकता व जागरूकता वाढविण्यात हा उपक्रम मोलाची भूमिका बजावेल.

या यशोगाथा पुस्तिकेमुळे अधिकाधिक कुटुंबे योजनांचा लाभ घेऊन सक्षम, स्वावलंबी आणि प्रगत बनतील, असा मला विश्वास आहे.

या उपक्रमाशी संबंधित सर्व अधिकारी, कर्मचारी आणि लाभार्थ्यांचे मी मनःपूर्वक अभिनंदन करतो आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा देतो.

**देवेंद्र फडणवीस**
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन



**मा. श्री. एकनाथ संभाजी शिंदे**
उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

# शुभेच्छा संदेश

यावल आदिवासी प्रकल्प कार्यालयाने तयार केलेली ही डिजिटल यशोगाथा पुस्तिका आदिवासी समाजाच्या विकासासाठी राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि लाभार्थ्यांच्या प्रगतीची झलक दर्शवणारा अत्यंत महत्त्वपूर्ण उपक्रम आहे.

तंत्रज्ञानाचा वापर करून लाभार्थ्यांच्या अनुभवांना व्हिडिओ डॉक्युमेंट्रीच्या स्वरूपात सादर करण्यासाठी पुस्तिकेत समाविष्ट केलेले स्कॅन बार कोड हे नाविन्यपूर्ण पाऊल असून, त्यामुळे माहिती अधिक सुलभ आणि पारदर्शक पद्धतीने सर्वांपर्यंत पोहोचेल.

या यशोगाथा अधिकाधिक कुटुंबांना योजनांचा लाभ घेण्यासाठी प्रेरणा देतील आणि त्यांच्या जीवनमान उन्नतीस निश्चितच हातभार लावतील, असा मला विश्वास आहे.

या उपक्रमात सहभाग घेतलेल्या सर्व अधिकारी, कर्मचारी आणि लाभार्थ्यांचे मी मनःपूर्वक अभिनंदन करतो आणि पुढील कार्यासाठी शुभेच्छा देतो.

**एकनाथ संभाजी शिंदे**
उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

## शुभेच्छा संदेश



**मा.श्रीमती सुनेत्रा अजित पवार**
उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

यावल आदिवासी प्रकल्प कार्यालयातर्फे साकार करण्यात आलेली ही डिजिटल यशोगाथा पुस्तिका आदिवासी बांधवांच्या सर्वांगीण सक्षमीकरणाच्या दिशेने उचललेले एक उल्लेखनीय पाऊल आहे. विविध शासकीय योजनांचा लाभ प्रभावीपणे लाभार्थ्यांपर्यंत पोहोचत असल्याचे स्पष्ट दर्शन या यशोगाथांमधून घडते.

पुस्तिकेत दिलेले लाभार्थ्यांचे अनुभव, मुलाखती आणि व्हिडिओ डॉक्युमेंट्रीसाठी उपलब्ध केलेले स्कॅन बार कोड ही नाविन्यपूर्ण कल्पना जागरूकता वाढविण्यास तसेच अधिकाधिक कुटुंबांना योजनांचा लाभ मिळवून देण्यास निश्चितच उपयुक्त ठरेल.

या उपक्रमामुळे आदिवासी समाजाच्या जीवनमान उन्नतीस नवे बळ मिळेल, असा मला विश्वास आहे. या पुस्तिकेच्या निर्मितीत योगदान देणाऱ्या सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांचे मी अभिनंदन करतो आणि पुढील कार्यास मनःपूर्वक शुभेच्छा देतो.

**मा.श्रीमती सुनेत्रा अजित पवार**
उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन



**डॉ.अशोक जनाबाई रामाजी वुईके**

आदिवासी विकास विभाग मंत्री

## शुभेच्छा संदेश

यावल आदिवासी प्रकल्प कार्यालयातर्फे प्रकाशित करण्यात आलेली ही डिजिटल यशोगाथा पुस्तिका हा आदिवासी समाजाच्या सर्वंकष विकासाचा आणि शासनाच्या योजना प्रभावीपणे तळागाळापर्यंत पोहोचत असल्याचा जिवंत पुरावा आहे.

विभिन्न योजनांचा लाभ घेऊन आपले जीवनमान उंचावणाऱ्या लाभार्थ्यांच्या प्रेरणादायी कथा या पुस्तिकेत समाविष्ट करण्यात आल्या आहेत. व्हिडिओ डॉक्युमेंट्री पाहण्यासाठी दिलेले स्कॅन बार कोड हा तंत्रज्ञानाचा सकारात्मक वापर असून, माहितीचे प्रसारण अधिक सुलभ, पारदर्शक आणि परिणामकारक करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम निश्चितच आदर्श मानावा असा आहे.

ही यशोगाथा पुस्तिका अधिकाधिक आदिवासी कुटुंबांना योजनांचा लाभ घेण्यासाठी प्रेरक ठरेल, असा मला ठाम विश्वास आहे. या उपक्रमात योगदान देणाऱ्या सर्व अधिकारी, कर्मचारी आणि लाभार्थ्यांचे मी मनःपूर्वक अभिनंदन करतो आणि पुढील कार्यासाठी शुभेच्छा देतो.

**डॉ.अशोक जनाबाई रामाजी वुईके**

आदिवासी विकास विभाग मंत्री

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन



**मा.ना.गुलाबराव रघुनाथ पाटील**

मंत्री, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग,
महाराष्ट्र राज्य
तथा पालकमंत्री, जळगाव.

## शुभेच्छा संदेश

यावल आदिवासी प्रकल्प कार्यालयामार्फत साकारण्यात आलेली ही 'डिजिटल यशोगाथा' पुस्तिका पाहून मला अत्यंत आनंद होत आहे. आदिवासी बांधवांच्या सर्वांगीण सक्षमीकरणाच्या दिशेने हे एक अत्यंत उल्लेखनीय आणि कौतुकास्पद पाऊल आहे.

शासकीय योजना केवळ कागदावर न राहता, त्या शेवटच्या घटकापर्यंत कशा प्रकारे पोहचत आहेत आणि त्यांच्या जीवनात कसा सकारात्मक बदल घडवत आहेत, याचे जिवंत दर्शन या यशोगाथांमधून घडते. या पुस्तिकेचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे यामध्ये वापरलेले स्कॅन बार कोड (QR Codes). मुलाखती आणि व्हिडिओ डॉक्युमेंट्री थेट मोबाईलवर पाहण्याची ही नाविन्यपूर्ण संकल्पना जनजागृतीसाठी अत्यंत प्रभावी ठरेल. यामुळे इतर आदिवासी कुटुंबांनाही या योजनांचा लाभ घेण्याची प्रेरणा मिळेल, असा मला पूर्ण विश्वास आहे.

आदिवासी समाजाच्या जीवनमान उन्नतीसाठी आमचे सरकार कटिबद्ध आहे. ही डिजिटल पुस्तिका त्या वचनबद्धतेचे एक उत्तम उदाहरण आहे. या नाविन्यपूर्ण पुस्तिकेच्या निर्मितीत योगदान देणाऱ्या सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे मी मनःपूर्वक अभिनंदन करतो.

अशाच प्रकारे नवनवीन उपक्रम राबवून आपण आदिवासी भागातील शेवटच्या माणसापर्यंत विकासाची गंगा पोहचवूया. यापुढील प्रवासास आणि कार्यास माझ्याकडून हार्दिक शुभेच्छा!

धन्यवाद!

**मा.ना.गुलाबराव रघुनाथ पाटील**
मंत्री, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र राज्य
तथा पालकमंत्री, जळगाव.

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | तपशील |
|---|---|
| 1 | आदिवासी विकास विभागाची माहिती |
| 2 | जळगाव जिल्हयाची माहिती |
| 3 | जळगाव जिल्हयाची तालुका निहाय लोकसंख्या |
| 4 | अनुसूचित क्षेत्रातील आदिवासी गावे, पेसा घोषित गावे, पाडे व सन 2011 च्या जनगणनेनुसार अनुसूचित क्षेत्रातील गावांची/पाड्यांची लोकसंख्याबाबत माहिती |
| 5 | प्रकल्प कार्यालय मंजुर भरलेली व रिक्त पदे10 |
| 6 | शिक्षण विभाग |
| 7 | शासकीय आश्रमशाळा विभाग |
| 8 | अनुदानित आश्रमशाळा विभाग |
| 9 | तालुक्यामधील शासकीय/अनुदानित आश्रमशाळा व वसतीगृह |
| 10 | शासकीय आश्रमशाळा ते ग्रामीण रुग्णालय अंतर |
| 11 | अनुदानित आश्रमशाळा ते ग्रामीण रुग्णालय अंतर |
| 12 | आदिवासी मुला/ मुलीचे वसतीगृह माहिती/ पंडित दिनदयाल /नामांकिंत शाळा योजना |
| 13 | सैनिकी शाळा / भारत सरकार शिष्यवृत्ती / सुवर्ण महोत्सवी |
| 14 | केंद्रवती योजना न्यु.ब.यो. / वि.कें.स. |
| 15 | सेवायोजन नोंदणी / ठक्करबाप्पा योजना |
| 16 | कन्यादान योजना / अमृत आहार योजना / शबरी घरकूल |
| 17 | जिल्हा वार्षिक आदिवासी घटक कार्यक्रम सन 2023-24 |
| 18 | वनहक्क योजना |
| 19 | पंचायत क्षेत्र विस्तार कायदा, 1996 (पेसा) बाबत माहिती |
| 20 | प्रधानमंत्री वनधन योजना |
| 21 | विविध योजना माहिती पत्रके |

# एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, यावल
# ता.यावल, जि. जळगाव

आदिवासींच्या कल्याणाच्या योजनांची परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठी सन 1972 मध्ये समाजकल्याण विभागांतर्गत आदिवासी विकास संचालनलयाची स्थापना करण्यात आली होती. त्यांनतर 1976 साली आदिवासी विकास आयुक्तालय सुरु करण्यात आले. दिनांक 22 एप्रिल 1983 रोजी स्वतंत्र आदिवासी विकास विभागाची स्थापना करण्यात आली आणि 1984 पासुन आदिवासी विकास विभाग स्वतंत्रपणे कार्यरत आहे. आदिवासी विकास विभागाच्या बळकटीकरणाकरीता सन 1992 मध्ये आदिवासी विकास संचालनालय हे आदिवासी आयुक्तालयात विलीन करण्यांत आले.

आदिवासी विकास विभागांतर्गत ठाणे, नाशिक, अमरावती व नागपूर येथे चार अपर आयुक्त व 30 एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालये सुरु असुन, त्यांच्या मार्फत मागासवर्गीय कल्याणाच्या राज्य व केंद्र शासनाच्या योजनांची अंमलबजावणी केली जाते. या योजनातर्गत सामाजिक कल्याण, आर्थिक कल्याण, शिक्षणामध्ये प्रगती, सामाजिक न्याय, महिला व बाल विकास, आरोग्य,पोषण, रोजगार इत्यादी बाबतच्या योजना राबविण्यात येतात. सन 2024-25 च्या अर्थसंकल्पामध्ये आदिवासी विकास विभागाकरिता रु.12655.00 कोटी इतका नियतव्यय मंजूर करण्यांत आला आहे.

समाजातील आदिवासींच्या आदिवासी घटक अत्यंत दुर्बल असून त्याचा अर्थिक, शैक्षणिक, समाजिक व सांस्कृतिक विकास करण्यासाठी आणि त्यांना सामाजिक अर्थिक इतर सर्व प्रकारचे शोषण या पासून संरक्षण देण्यास शासन कटिबध्द असून त्यांचा सर्वांगीन विकासासाठी महाराष्ट्र शासनाने स्वतंत्र आदिवासी विकास प्रकल्पांची निर्मिती केलेली असून, महाराष्ट्र राज्यात एकुण 30 आदिवासी प्रकल्प आहेत.यापैकी प्रकल्प अधिकारी ,एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, यावल जि.जळगाव येथे प्रकल्प कार्यालय कार्यरत आहे. सदर प्रकल्पाचे कार्यक्षेत्र जळगाव जिल्हयातील 15 तालुक्यामध्ये आहे.

महाराष्ट्र राज्याचे एकुण भौगोलिक क्षेत्र 3,07,793 चौ.किमी. आहे. त्यापैकी आदिवासी क्षेत्र 50,757 चौ.कि.मी. क्षेत्र आदिवासी उपयोजनेखाली येते. याचे प्रमाण 16.5 टक्के एवढे होते. त्यापैकी जळगाव जिल्हयातील आदिवासी क्षेत्र. 68.24 चौ.कि.मी.आहे.

महाराष्ट्र राज्यात एकूण 45 अनुसूचित जमाती असून त्यात प्रामुख्याने भिल्ल, गोंड, कोळी महादेव, पावरा, ठाकुर, वारली यांचा समावेश आहे.यवतमाळ जिल्हयातील कोलाम, रायगड, ठाणे व पालघर जिल्हयातील कातकरी आणि गडचिरोली जिल्हयातील माडिया अशा तीन जमाती केंद्र शासनाने अदिम जमाती म्हणून अधिसूचित केलेल्या आहेत.

# दृष्टीक्षेपात जळगाव जिल्हा :-



महाभारताच्या भीष्मपर्वात विविध प्रदेशाचा गोमंती, मंदका, खंडा, विदर्भा व रूपवाहिका असा उल्लेख आढळतो. त्यातील खंडा म्हणजे खान्देश असाही अर्थ पाश्चात्य इतिहासकारांनी लावला आहे. गुजरात सुल्तान पहिला अहमद याने या प्रदेशातील दुसरा फारूकी राजा मलीक याला खान ही पदवी बहाल केली होती व त्यावरून खान्देश नाव पडले होते. थोडक्यात हल्लीच्या धुळे व जळगाव या दोन्ही जिल्ह्यांचा प्रदेश मध्ययुगीन काळापासून खान्देश यानावाने ओळखला जात असे व एकच जिल्हा म्हणून धुळे मुख्यालयातून याचा कारभार चालत असे. तथापि प्रशासनाच्या दृष्टीने सन 1906 मध्ये खान्देशची पुर्व खान्देश व पश्चिम खान्देश असे या दोन जिल्ह्यात विभाजन करण्यात आले. जळगाव मुख्यालय असलेला 10 तालुके व 3 पेठ्यांचा मिळून पुर्व खान्देश जिल्हा होता. 1917 मध्ये पारोळा पेठा व त्यानंतर भडगाव व एदलाबाद (मुक्ताईनगर) या पेठ्यांना तालुक्याचा दर्जा देण्यात आला.

1950 मध्ये चाळीसगाव तालुक्यातील 13 गावे औरंगाबाद जिल्ह्यात वर्ग करण्यात आली. 1956 मधील राज्य पुर्नरचनेत मुंबई राज्यात समाविष्ट असलेला पुर्व खान्देश हा जिल्हा 1960 मध्ये स्थापन झालेला महाराष्ट्र राज्याचा 1 जिल्हा म्हणून राहिला. दिनांक 10/10/1960 पासून महाराष्ट्र शासनाने नावात बदल केल्याने पुर्व खान्देश ऐवजी जळगाव जिल्हा या नावाने हा जिल्हा ओळखला जाऊ लागला. केळीचे आगार ही जळगाव जिल्हयाची सर्वात महत्वाची ओळख होय.

महाराष्ट्र शासन महसूल व वनविभागाच्या 23 जून 1999 च्या अधिसूचनेनुसार भुसावळ व एरंडोल तालुक्याचे विभाजन करून अनुक्रमे बोदवड आणि धरणगाव हे दोन नवीन तालुके निर्माण करण्यात आलेले आहेत. त्यामुळे जळगाव जिल्ह्यात 23 जून 1999 पासून 13 ऐवजी 15 तालुके आहेत. महाराष्ट्र शासनाच्या नगर रचना विभागाच्या 28/3/2003 च्या अधिसूचनेनुसार जळगाव नगर पालिकेला महानगर पालिकेचा दर्जा दिलेला आहे.

# भौगोलिक रचना :-

जळगाव जिल्हा दख्खनच्या पठाराचा एक भाग असून विविधतेने नटलेला एक सुंदर निसर्ग संपदा प्राप्त असेलला डोंगराळ भाग आहे. या परिसरात डोंगराळ वनक्षेत्राचा समावेश असून तापी खोऱ्याचा सधन व सपाट पट्टा आहे, त्यामुळे परिसरातील अनेक भागात जलसिंचनास वाव आहे. या संपूर्ण परिसराचा भौगोलिक परिसरात मध्यभागी सधन तापी खोऱ्याचा पट्टा उत्तर नैऋत्येस सधन तापी खोऱ्याचा पट्टा व जंगल व्याप्त असा उंच सातपुड्याचा भाग आहे. आणि दक्षिणेस व नैऋत्येस टेकड्यांचा व जलसिंचन सोई असलेला अजिंठा पर्वतराजींच्या भागात विभागलेला आहे.

जळगाव जिल्ह्याच्या उत्तरेस सातपुडा, नैऋत्येस हट्टी व दक्षिणेस अजिंठा (सातमाळा) अशा तीन पर्वतराजी पसरलेल्या आहेत.

सातपुडा पर्वताच्या मध्यभागात 650 ते 700 मीटर पर्यंत व सातमाळा पर्वतराजीत उतरत्या श्रेणीत 180 मीटर पर्यंत उंची आहे.

जिल्ह्यात तापी नदी ही पुर्वकडून पश्चिमेकडे वाहते. जिल्ह्याचा मध्यभाग हा तापी खोयांचा सुपिक प्रदेश असून त्याच्या उत्तरेस उंच व विस्तीर्ण सातपुडा पर्वतराजी व नैऋत्य दिशेस अजिंठा पर्वताच्या रांगा आहे. जिल्ह्यातील विविध ठिकाणची समुद्र सपाटीपासूनची उंची 175 ते 325 मीटर दरम्यान आहे.



# जिल्ह्याची प्रशासकीय यंत्रणा :-

सार्वंगिण व एकात्मिक विकासाच्या दृष्टीने जिल्ह्यातील सर्व गावे 15 पंचायत समित्यांमधील समाविष्ट केलेली आहेत. जिल्ह्यातील 1152 ग्रामपंचायती असून त्यांची सभासद संख्या 10021 आहे.

जळगाव जिल्ह्यातील 15 तालुक्यांपैकी जळगाव येथे महानगरपालिका असून उर्वरीत 14 तालुक्यांत नगरपरिषदा आहेत. यावल, रावेर व भुसावळ तालुक्यात प्रत्येकी 2 नगरपरिषदा आहेत. बोदवड या तालुक्यांच्या मुख्यालयी ग्रामपंचायती आहेत.



## जिल्हयात जिल्हा परिषदेचे 68 मतदारसंघ असून पंचायत समितीचे 136 मतदारसंघ आहेत.

## जिल्ह्याविषयी थोडक्यात

आदिवासी उपयोजना क्षेत्र अंतर्गत टीएसपी गावे - 63

पेसा क्षेत्रातील ग्रामपंचायती - 34

शासकीय आश्रमशाळा - 17 विद्यार्थी संख्या - 5210

अनुदानित आश्रमशाळा -34 विद्यार्थी संख्या- 20938



शासकीय वसतिगृहे – 17 विद्यार्थी संख्या - 2028

अमृत आहार योजना आदिवासी उपयोजनातंर्गत अंगणवाडी संख्या – 117 गावे- 58

कुपोषण स्थिती
•SAM- 21
•MAM- 308
•गरोदर माता- 5608
• स्तनदा माता- 6972

- जिल्ह्याची लोकसंख्या - 42.29 लक्ष
- जिल्ह्याचे क्षेत्रफळ - 11765 Sq.Km
- आदिवासी लोकसंख्या- 6.04 लक्ष
- आदिवासी टक्केवारी -14.28 टक्के
- एकुण तालुके -15
- उपयोजनेंतर्गत तालुके – 3
- आदिवासी लोकसंख्या (टीएसपी)
- रावेर - लो.सं - 53512
- चोपडा - लो.सं - 96521
- यावल - लो.सं - 68248

# जळगाव जिल्ह्याची लोकसंख्या

जळगाव जिल्ह्याची एकूण लोकसंख्या 42.28 लाख असून त्यापैकी अनु.जमातीची लोकसंख्या 6.04 लाख आहे. एकूण लाकसेख्येशी आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण 14.28 टक्के आहे. सन 2011 च्या जनगणनेनुसार जळगाव जिल्हृयाची एकूण व आदिवासी लोकसंख्या खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तालुका | एकूण लोकसंख्या | पैकी आदिवासी लोकसंख्या | आदिवासी लोकसंख्येची एकूण लोकसंख्येशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | चोपडा | ३१२८१५ | ९६५२१ | ३०.८६ |
| २ | यावल | २७२२४२ | ६८२४८ | २५.०७ |
| ३ | रावेर | ३१२०८२ | ५३५१२ | १७.१५ |
| ४ | मुक्ताईनगर | १६३४४४ | २८८४९ | १७.६५ |
| ५ | बोदवड | ९१७९९ | ६६४७ | ७.२४ |
| ६ | भुसावळ | ३५९४६१ | २३१०० | ६.४३ |
| ७ | जळगाव | ६७६०४१ | ६८०७५ | १०.०७ |
| ८ | एरंडोल | १६६५२१ | २४६०४ | १४.७८ |
| ९ | धरणगाव | १७३४४७ | २९५२४ | १७.०२ |
| १० | अमळनेर | २८७८४९ | ४१८८३ | १४.५५ |
| ११ | पारोळा | १९६८६३ | २७११९ | १३.७८ |
| १२ | भडगाव | १६२८८९ | २२७१२ | १३.९४ |
| १३ | चाळीसगाव | ४१४८७९ | ४५८०० | ११.०४ |
| १४ | पाचोरा | २८९६२८ | २८७५४ | ९.९३ |
| १५ | जामनेर | ३४९९५७ | ३९०१९ | ११.१५ |
| | एकूण | ४२२९९१७ | ६०४३६७ | १४.२८ |



# प्रस्तावना

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यावल जि. जळगाव या कार्यालयाचे कार्यक्षेत्र संपूर्ण जळगाव जिल्हा आहे. जिल्हयातील एकूण 15 तालुक्यापैकी तीन तालुक्यातील (यावल, रावेर, चोपडा) पेसा गावे/ पाडे 93 आदिवासी उपयोजना क्षेत्रात अंतर्भूत आहेत. एकुण 34 ग्रामंपाचायती आहेत त्या खालीलप्रमाणे

| एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, यावल जि.जळगाव अंतर्गत | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनुसूचित क्षेत्रातील पेसा घोषित गावे, पाडे व सन 2011 च्या जनगणनेनुसार लोकसंख्या | | | | | | |
| अ.क्र. | तालुका | ग्रामपंचायतीचे नाव | पेसा घोषित गावांची/ पाड्यांची यादी | एकूण लोकसंख्या | अनुसूचित जमाती लोकसंख्या | अनुसूचित जमाती टक्केवारी |
| १ | चोपडा | मोरचिडा | मोरचिडा | ८६६ | ८६५ | ९९.८८ |
| २ | चोपडा | उमर्टी | अंमलवाडी | ७०५ | ६९९ | ९९.१५ |
| ३ | चोपडा | | उमर्टी | २५७६ | २४१४ | ९३.७१ |
| ४ | चोपडा | | गौऱ्यापाडा | ७८५ | ७८५ | १००.०० |
| ५ | चोपडा | सत्रासेन | सत्रासेन | ३६६२ | २९०७ | ७९.३८ |
| ६ | चोपडा | | भादलेनगर | 352 | ३५२ | १००.०० |
| ७ | चोपडा | | उत्तमनगर | १०१६ | १०१६ | १००.०० |
| ८ | चोपडा | गणपुर (Non Pesa) | मराठे | ८३१ | ६५२ | ७८.४६ |
| ९ | चोपडा | कृष्णापुर | कृष्णापुर | १४४८ | ९४३ | ६५.१२ |
| १० | चोपडा | वैजापुर | वैजापुर | १२७३ | ११०४ | ८६.७२ |
| ११ | चोपडा | | खाऱ्यापाडाव | १२४८ | १२४१ | ९९.४४ |
| १२ | चोपडा | | विजयनगरपाडा | ३७४ | ३७४ | १००.०० |
| १३ | चोपडा | | मुळ्यावतार | ५८३ | ५८२ | ९९.८३ |
| १४ | चोपडा | | शेनपाणी | ९१३ | ९११ | ९९.७८ |
| १५ | चोपडा | कर्जाणे | कर्जाणे | १३६३ | १३४० | ९८.३१ |
| १६ | चोपडा | मेलाणे | मेलाणे | २५५६ | २५२९ | ९८.९४ |
| १७ | चोपडा | | डेडियापाडा | २४३ | २४३ | १००.०० |
| १८ | चोपडा | | घोडाचापरपाडा | २१८ | २१८ | १००.०० |
| १९ | चोपडा | | निलपाणी (ताराघाटी) | १०६ | १०६ | १००.०० |
| २० | चोपडा | | वघईमातापाडा | ९८ | ९८ | १००.०० |
| २१ | चोपडा | | गोहमालपाडा | २१० | २१० | १००.०० |
| २२ | चोपडा | | खैरकुंडीपाडा | ५० | ५० | १००.०० |
| २३ | चोपडा | देव्हारी | देव्हारी | ४६७ | ४६७ | १००.०० |
| २४ | चोपडा | | देवझिरी | १७७३ | १७४१ | ९८.२० |
| २५ | चोपडा | | बोरमळी | १६२७ | १६२६ | ९९.९४ |
| २६ | चोपडा | विरवाडे (Non Pesa) | मालापुर | १९०३ | १९०३ | १००.०० |
| २७ | चोपडा | | निंबापुर | १२५ | १२५ | १००.०० |
| २८ | चोपडा | | बेड्यापाणी | ११२ | ११२ | १००.०० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २९ | चोपडा | | शिकारबल्ली | १८० | १८० | १००.०० |
| ३० | चोपडा | | जुनानवागाव पाडा | १०५ | १०५ | १००.०० |
| ३१ | चोपडा | | गोलबल्ली (जामण्यापाणी) | १९८ | १९८ | १००.०० |
| ३२ | चोपडा | | साग्यादेव | २४५ | २४५ | १००.०० |
| ३३ | चोपडा | | पिंपरीपाणी-नावजीखुरा | ९८ | ९८ | १००.०० |
| ३४ | चोपडा | | बोरपाडा | ११२ | ११२ | १००.०० |
| ३५ | चोपडा | विष्णापुर | विष्णापुर | १३६८ | ८३६ | ६१.११ |
| ३६ | चोपडा | बोरअजंटी | बोरअजंटी | २३६४ | २०७५ | ८७.७७ |
| ३७ | चोपडा | | धरणपाडा | २३४ | २३४ | १००.०० |
| ३८ | चोपडा | बिडगाव (अंशत:पेसा) | कुंड्यापाणी | १३०५ | १३०५ | १००.०० |
| ३९ | चोपडा | | बडई | ४६९ | ४६९ | १००.०० |
| ४० | चोपडा | | बडवाणी | २६४ | २६४ | १००.०० |
| ४१ | चोपडा | मोहरद | मोहरद | २५९० | १८३७ | ७०.९३ |
| ४२ | चोपडा | | खंडने | ५६५ | ५६५ | १००.०० |
| ४३ | चोपडा | वरगव्हाण (अंशत:पेसा) | इच्छापुर (शिवरे बु.) | १६३० | १६३० | १००.०० |
| १ | यावल | बोरखेडा खु. | बोरखेडा खु. | १८०७ | १६१६ | ८९.४३ |
| २ | यावल | परसाडे बु. | परसाडे बु. | १८१० | १२६५ | ६९.८९ |
| ३ | यावल | गाड्र्या जामन्या | गाड्र्या | ८७४ | ८५५ | ९७.८३ |
| ४ | यावल | | जामन्या | ९६६ | ९६५ | ९९.९० |
| ५ | यावल | | उसमळी | ७४५ | ७४५ | १००.०० |
| ६ | यावल | | लंगडा आंबा | ३५७ | ३१० | ८६.८३ |
| ७ | यावल | मालोद | मालोद | २१९८ | १६३० | ७४.१६ |
| ८ | यावल | | वाघझिरा | १६२५ | १५९९ | ९८.४० |
| ९ | यावल | | इचखेडा | १८८ | १८६ | ९८.९४ |
| १० | यावल | | रूईखेडा | ५५४ | ५५० | ९९.२८ |
| ११ | यावल | | खालकोट | २६६ | २६६ | १००.०० |
| १२ | यावल | | मानापुरी | ३०१ | ३०१ | १००.०० |
| १३ | यावल | | आंबापाणी पाडा | ८१८ | ८१८ | १००.०० |
| १४ | यावल | | चिपखेडा | ३२० | ३२० | १००.०० |
| १५ | यावल | | माथन | ३३८ | ३३८ | १००.०० |
| १६ | यावल | | साग्यादेव | ३२० | ३२० | १००.०० |
| १७ | यावल | मोहराळे (Non Pesa) | हरीपुरा | १२४९ | ११८० | ९४.४८ |
| १८ | यावल | | आंबापाणी | ३७० | ३७० | १००.०० |
| १९ | यावल | | पांढरीवस्ती | २६३ | २६३ | १००.०० |
| २० | यावल | | जामुनझिरा | २१८ | २१८ | १००.०० |
| २१ | यावल | मारुळ (अंशत:पेसा) | चारमळी | ६७३ | ३७१ | ५५.१३ |
| १ | रावेर | आभोडे बु. | आभोडे बु. | १९२४ | १५१२ | ७८.५९ |
| २ | रावेर | कुसूंबे बु. | कुसुंबे बु. | २२२२ | ८२५ | ३७.१३ |
| ३ | रावेर | कुसूंबे खु. | कुसुंबे खु. | १७१८ | ८४० | ४८.८९ |
| ४ | रावेर | जानोरी | जानोरी | ११५१ | ११२३ | ९७.५७ |
| ५ | रावेर | जिन्सी | जिन्सी | २१०८ | ८७१ | ४१.३२ |
| ६ | रावेर | | मोरव्हाल | १७६६ | १६४९ | ९३.३७ |
| ७ | रावेर | | गुलाबवाडी | ४९६ | १२३ | २४.८० |
| ८ | रावेर | निमड्या | निमड्या | १२९८ | १२९० | ९९.३८ |
| ९ | रावेर | | गारबर्डी | ७०९ | ७०९ | १००.०० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १० | रावेर | निमड्या | गारखेडा | १४३७ | १४३५ | ९९.८६ |
| ११ | रावेर | | पिंपरकुंड | ३५० | ३५० | १००.०० |
| १२ | रावेर | | सायबुपाडा | २६५ | २६५ | १००.०० |
| १३ | रावेर | | हरसिंगपाडा | १४५ | १४५ | १००.०० |
| १४ | रावेर | | भंगीपाडा | १६० | १६० | १००.०० |
| १५ | रावेर | | गारखेडावस्ती | १५० | १५० | १००.०० |
| १६ | रावेर | | कास्याचापाडा | १७० | १७० | १००.०० |
| १७ | रावेर | | सुकीधरणवस्ती | १५० | १५० | १००.०० |
| १८ | रावेर | पाडळे बु. | पाडळे बु. | १३७२ | ६३५ | ४६.२८ |
| १९ | रावेर | पाल | पाल | ७०४१ | ३५५३ | ५०.४६ |
| २० | रावेर | पिंप्री | पिंप्री | ११७० | ७०० | ५९.८३ |
| २१ | रावेर | मोहमांडली | मोहमांडली | ७७९ | ७७६ | ९९.६१ |
| २२ | रावेर | | तिडया | ६६९ | ६६६ | ९९.५५ |
| २३ | रावेर | | अंधारमळी | ९१३ | ८९७ | ९८.२५ |
| २४ | रावेर | | जुनी मोहमांडली | १५३ | १५३ | १००.०० |
| २५ | रावेर | लोहारा | लोहारा | ४८०१ | ३०३५ | ६३.२२ |
| २६ | रावेर | | चिंचाटी | ५५३ | ५३९ | ९७.४७ |
| २७ | रावेर | | मोहमांडली (जुनी) | १५३ | १५३ | १००.०० |
| २८ | रावेर | सहस्त्रलिंग | सहस्त्रलिंग | ६२१ | ६०२ | ९६.९४ |
| २९ | रावेर | | लालमाती | ८६२ | २९१ | ३३.७६ |
| ३० | रावेर | अहिरवाडी (Non Pesa) | मोहगन बु. | ५०७ | ५०४ | ९९.४१ |
| | | | एकूण | ८७७९८ | ७१३४० | ८१.२५ |


चोपडा तालुका - एकूण ग्रा.पं. - १५ गावे / पाडे - ४३


यावल तालुका - एकूण ग्रा.पं. - ०६ गावे / पाडे - २१

रावेर तालुका - एकूण ग्रा.पं. - १३ गावे / पाडे - २९

एकूण पेसा ग्रामपंचायती - ३४

एकूण पेसा गावे / पाडे - ९३






## प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, यावल


### कर्मचारी सुधारित आकृतीबंध

| अ.क्र. | पदसंवर्ग | विभाग | यावल | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | मंजूर | भरलेले | रिक्त |
| १ | प्रकल्प अधिकारी वर्ग १ ( श्रेणी 2 ) | आविवि | १ | १ | ० |
| | एकुण वर्ग 1 | | १ | १ | ० |
| २ | सहाय्यक प्रकल्प अधिकारी | आविवि | ३ | १ | २ |
| ३ | सहाय्यक प्रकल्प अधिकारी (शि) | आविवि | ३ | ० | ३ |
| ४ | नियोजन अधिकारी | नियोजन | ० | ० | ० |
| ५ | लेखा अधिकारी | वित्त | १ | ० | १ |
| ६ | सहाय्यक लेखा अधिकारी | वित्त | १ | ० | १ |
| | एकुण वर्ग 2 | | ८ | २ | ६ |
| ७ | कार्यालय अधिक्षक | आविवि | २ | १ | १ |
| ८ | संशोधन सहाय्यक | आविवि | ० | ० | ० |
| | | नियोजन | १ | १ | ० |
| ९ | वरिष्ठ आदिवासी विकास निरिक्षक | आविवि | १ | ० | १ |
| १० | निम्नश्रेणी लघुलेखक | आविवि | ० | ० | ० |
| ११ | आदिवासी विकास निरिक्षक | आविवि | ५ | ३ | २ |
| १२ | उपलेखापाल | आविवि | १ | ० | १ |
| | | वित्त | २ | २ | ० |
| १३ | मुख्यलिपीक | आविवि | १ | १ | ० |
| १४ | कनिष्ठ शि.वि. अधिकारी (कार्या) | आविवि | ३ | २ | १ |
| १५ | कनिष्ठ शि.वि. अधिकारी (निरि) | आविवि | ५ | ० | ५ |
| १६ | लघुटंकलेखक | आविवि | १ | ० | १ |
| १७ | वरिष्ठ लिपीक | आविवि | ८ | २ | ६ |
| १८ | सांख्यकी सहाय्यक | आविवि | १ | ० | १ |
| १९ | कनिष्ठ लिपीक | आविवि | २० | १५ | ५ |
| | एकुण वर्ग ३ | | ५१ | २७ | २४ |
| | एकुण वर्ग १ ते वर्ग ३ नियमित पदे | | ६० | ३० | ३० |




# जळगाव शहरानजीक असलेल्या कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या परिसरातील आदिवासी मुलींचे नवीन शासकीय वस्तीगृहाची काही क्षणचित्रे
























# शिक्षण विभाग

## 1. शासकीय आश्रमशाळा समूह योजना



आदिवासी विकास विभागामार्फत आदिवासी विद्यार्थ्यांसाठी आश्रमशाळा चालविल्या जातात. अतिशय डोंगराळ व दुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासींची सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक उन्नती करण्यासाठी शासनाने आश्रमशाळा समूह ही योजना कार्यान्वित केली आहे. या आश्रमशाळेत मोफत प्रवेश, प्रवेशित विद्यार्थ्यांना निवास, मोफत भोजन तसेच लाभाचे थेट हस्तांतरणांतर्गत गणवेश, अंथरुण, पांघरुण, पुस्तके, लेखन साहित्य इ. सुविधांबाबत आर्थिक मदत विद्यार्थी व पालक यांच्या राष्ट्रीय बँक खात्यात अदा करण्यात येते.

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यावल कार्यालयामार्फत 17 शासकीय आश्रमशाळा कार्यान्वित आहेत. त्यापौकी ०३ आश्रमशाळा प्राथमिक, १२ आश्रमशाळा माध्यमिक तसेच ०२ आश्रमशाळांना कनिष्ठ महाविद्यालय संलग्न आहेत. सदर आश्रमशाळांमध्ये प्रवेश घेणेसाठी विहीत नमुन्यातील प्रवेश अर्ज संबंधित आश्रमशाळेचे मुख्याध्यापक यांच्याकडे विनामूल्य उपलब्ध होतील.



# प्रकल्प क्षेत्रातील शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थी संख्येची माहिती

| अ.क्र. | शासकीय आश्रम शाळेची नावे | क्षेत्र | सन 2024-2025 | | | वर्ग 3 कर्मचारी | | | वर्ग 4 कर्मचारी | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | मुले | मुली | एकुण | म. | भ. | रि. | म. | भ. | रि. | |
| १ | वाघझिरा, ता.यावल | टिएसपी | २७५ | १७६ | ४५१ | २६ | १८ | ८ | ४ | १० | -६ | उच्च माध्य. |
| २ | डोंगरकठोरा, ता.यावल | ओटिएसपी | 161 | १३१ | २९२ | १६ | १० | ६ | ४ | ११ | -७ | माध्य. |
| ३ | मालोद, ता.यावल | टिएसपी | ५४ | ५७ | १११ | १० | ७ | ३ | ४ | ११ | -७ | प्राथ. |
| ४ | वैजापूर, ता.चोपडा | टिएसपी | ० | ५९७ | ५९७ | २६ | २३ | ३ | ४ | ९ | -५ | कन्या उच्च माध्य. |
| ५ | देवझिरी, ता.चोपडा | टिएसपी | १७९ | १९७ | ३७६ | १५ | ९ | ६ | ४ | ७ | -३ | माध्य. |
| ६ | कृष्णापूर, ता.चोपडा | टिएसपी | ९० | ९३ | १८३ | १० | ४ | ६ | ४ | ७ | -३ | प्राथ. |
| ७ | विष्णापूर, ता.चोपडा | टिएसपी | १६५ | १३८ | ३०३ | १० | ८ | २ | ४ | ९ | -५ | प्राथ. |
| ८ | पिंगळवाडे ता.अमळनेर | ओटिएसपी | १७२ | १५२ | ३२४ | १६ | १३ | ३ | ४ | ११ | -७ | माध्य. |
| ९ | दहिवद, ता.अमळनेर | ओटिएसपी | २१२ | १६० | ३७२ | १६ | १३ | ३ | ४ | १३ | -९ | माध्य. |
| १० | चांदसर, ता.धरणगांव | ओटिएसपी | २१५ | १५१ | ३६६ | १६ | ०९ | ७ | ४ | १० | -६ | माध्य. |
| ११ | लालमाती, ता.रावेर | टिएसपी | १५८ | १२४ | २८२ | १६ | १० | ६ | ४ | ६ | -२ | माध्य. |
| १२ | गंगापूरी, ता.जामनेर | ओटिएसपी | १८२ | १२१ | ३०३ | १५ | १४ | १ | ४ | ११ | -७ | माध्य. |
| १३ | पळासखेडा, ता.बोदवड | ओटिएसपी | १८९ | १५८ | ३४७ | १५ | ११ | ४ | ४ | ९ | -५ | माध्य. |
| १४ | जोंधनखेडा, ता.मु.नगर | ओटिएसपी | १५७ | १८३ | ३४० | १५ | ११ | ४ | ४ | ४ | ० | माध्य. |
| १५ | वलठाण, ता.40गांव | ओटिएसपी | १९२ | १२० | ३१२ | १५ | १२ | ३ | ४ | ६ | -२ | माध्य. |
| १६ | सार्वे बु, ता.पाचोरा | ओटिएसपी | १९८ | १२७ | ३२५ | १६ | १४ | २ | ४ | १० | -६ | माध्य. |
| १७ | सोनबर्डी, ता.एरंडोल | ओटिएसपी | २३९ | १७७ | ४१६ | १६ | १० | ६ | ४ | ७ | -३ | माध्य. |
| | | एकुण | २८३८ | २८६२ | ५७०० | २६९ | १९६ | ७३ | ६४ | १५१ | -८३ | |


माध्यमिक आश्रमशाळा :- 03

माध्यमिक आश्रमशाळा :- 14

माध्य.शाळेस संलग्न उच्च माध्यमिक आश्रमशाळा :- 02

एकुण:- 17





## 1. शासकीय आश्रमशाळांमध्ये कनिष्ठ महाविद्यालय सुरुवात.

माध्यमिक आश्रमशाळा पूर्णत्वास पोहचलेल्या आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांना उच्च माध्यमिक शिक्षणाची सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी शासकीय माध्यमिक आश्रमशाळा वैजापूर येथे फक्त मुलींसाठी कनिष्ठ महाविद्यालय आहे. तसेच शासकीय आश्रमशाळा वाघझिरा येथे मुलांमुलीसाठी कनिष्ठ महाविद्यालय आहे.




## 2. स्वेच्छा संस्थामार्फत अनुदानित आश्रमशाळा सुरु आहे.

आदिवासींच्या शैक्षणिक विकासाकरिता स्वयंसेवी संस्थेमार्फत अनुदान तत्त्वावर आश्रमशाळा चालविल्या जातात. या आश्रमशाळेत मोफत प्रवेश, प्रवेशीत विद्यार्थ्यांना निवास, भोजन, गणवेश, अंथरुण, पांघरुण, पुस्तके, लेखन साहित्य इ. सुविधा संस्थेमार्फत मोफत पुरविण्यात येते.




एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यावल कार्यालयामार्फत 34 अनुदानित आश्रमशाळा कार्यान्वित आहेत. त्यापैकी, 20 आश्रमशाळा माध्यमिक तसेच 12 आश्रमशाळांना कनिष्ठ महाविद्यालय संलग्न आहेत. सदर आश्रमशाळामध्ये प्रवेश घेणेसाठी विहीत नमुन्यातील प्रवेश अर्ज संबंधित आश्रमशाळेचे मुख्याध्यापक यांच्याकडे विनामुल्य उपलब्ध होतील.

कर्मचायांचे वेतन व रु 2200 प्रमाणे प्रतिविद्यार्थी परिरक्षणासाठी अनुदान शासनाकडून देण्यात येते. प्राथमिक व माध्यमिक विभागातील कर्मचायांच्या वेतनावर आधारीत अनुक्रमे 8 टक्के व 12 टक्के आकस्मिक खर्च अनुदान अनुज्ञेय आहे.





# जळगाव शहरानजीक असलेल्या कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या परिसरातील आदिवासी मुलींचे नवीन शासकीय वस्तीगृहाची काही क्षणचित्रे







## अ) प्रकल्प क्षेत्रातील अनुदानित आश्रमशाळेतील विद्यार्थीसंखेची माहिती खालील प्रमाणे आहे

अनुदानित आश्रमशाळा विद्यार्थी संख्या

| अ.क्र. | अनुदानित आश्रमशाळांची नांवे | क्षेत्र | सन 2024-2025 | | | वर्ग 3 कर्मचारी | | | वर्ग 4 कर्मचारी | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | मुल | मुली | एकुण | म. | भ. | रि. | म. | भ. | रि. | |
| १ | सत्रासेन, ता. चोपडा | टिएसपी | ७७६ | ५९९ | १३७५ | ३४ | ३० | ४ | १२ | १२ | ० | क.महा. |
| २ | उमर्टी, ता. चोपडा | टिएसपी | ३०९ | २४१ | ५५० | १६ | १६ | ० | १२ | ११ | १ | माध्य. |
| ३ | बोरअजंटी, ता. चोपडा | ओटिएसपी | ४७६ | ३०६ | ७८२ | २४ | २१ | ३ | १२ | १२ | ० | क.महा |
| ४ | कर्जाणा, ता. चोपडा | टिएसपी | ६५३ | २९७ | ९५० | २८ | २३ | ५ | १२ | १२ | ० | क.महा |
| ५ | हातेड, ता. चोपडा | ओटिएसपी | ४२० | ३०२ | ७२२ | २४ | २४ | ० | १२ | १२ | ० | क.महा |
| ६ | सनफुले, ता. चोपडा | ओटिएसपी | ५३७ | ३०२ | ८३९ | ३२ | ३२ | ० | १२ | ११ | १ | क.महा |
| ७ | धानोरा, ता. चोपडा | ओटिएसपी | ४२६ | ३१४ | ७४० | २२ | २१ | १ | १२ | १० | २ | माध्य |
| ८ | पाल, ता. रावेर | टिएसपी | २८५ | २२५ | ५१० | १६ | १३ | ३ | १२ | १२ | ० | माध्य. |
| ९ | पिंप्रीमोहगण, ता. रावेर | टिएसपी | २६८ | १७२ | ४४० | १६ | १४ | २ | १२ | १२ | ० | माध्य. |
| १० | जामन्या, ता यावल | टिएसपी | २६३ | १५७ | ४२० | १६ | १३ | ३ | १२ | १२ | ० | माध्य. |
| ११ | मोहमांडली, ता. रावेर | टिएसपी | २३१ | १८३ | ४१४ | १६ | ११ | ५ | १२ | १२ | ० | माध्य. |
| १२ | रसलपूर, ता. रावेर | ओटिएसपी | २०६ | २१३ | ४१९ | १६ | १६ | ० | १२ | १२ | ० | माध्य. |
| १३ | मनवेल, ता. यावल | ओटिएसपी | ४२७ | २४८ | ६७५ | २७ | २२ | ५ | १२ | १२ | ० | माध्य. |
| १४ | लोहारा, ता. रावेर | टिएसपी | २४० | २६८ | ५०८ | १६ | १३ | ३ | १२ | १२ | ० | माध्य. |
| १५ | डोमगांव, ता. जळगांव | ओटिएसपी | २९६ | १७८ | ४७४ | १६ | १६ | ० | १२ | १२ | ० | माध्य. |
| १६ | कोथळी, ता. मु. नगर | ओटिएसपी | ४२३ | २३६ | ६५९ | २५ | २३ | २ | ११ | ०१ | ० | क.महा. |
| १७ | सातगांव डों., पाचोरा | ओटिएसपी | २१७ | १३७ | ३५४ | १६ | १३ | ३ | १२ | ०९ | ३ | माध्य. |
| १८ | बोरगाव ता धरणगाव | ओटिएसपी | ४१५ | २९१ | ७०६ | १८ | १६ | २ | ९ | ७ | २ | प्राथ. |
| १९ | खडकी, ता. 40गांव | ओटिएसपी | ४०४ | २०२ | ६०६ | २४ | २४ | ० | १२ | १२ | ० | क. महा |
| २० | देवळी, ता. 40गांव | ओटिएसपी | ६८७ | ४०८ | १०९५ | ३३ | ३३ | ० | १२ | १२ | ० | क.महा |
| २१ | मेहुणबारे, ता. 40गांव | ओटिएसपी | ७६९ | ३८५ | ११५४ | ३४ | ३२ | २ | १२ | १२ | ० | क. महा |
| २२ | गुढे, ता. भडगांव | ओटिएसपी | ६०५ | ३१६ | ९२१ | ३१ | ३१ | ० | १२ | १२ | ० | क. महा |
| २३ | पिंपरखेड, ता. भडगांव | ओटिएसपी | ३०९ | १७४ | ४८३ | १६ | १५ | १ | १२ | ११ | १ | माध्य. |
| २४ | तरडी, ता. पारोळा | ओटिएसपी | ३२१ | १५८ | ४८९ | १६ | १५ | १ | १२ | १२ | ० | माध्य. |
| २५ | बोळेतांडा ता. अमळनेर | ओटिएसपी | ३६६ | २०० | ५६६ | २४ | १८ | ६ | १२ | १२ | ० | माध्य. |
| २६ | ताडेपूरा, ता. अमळनेर | ओटिएसपी | ३०० | १३९ | ४३९ | १६ | १६ | ० | १२ | १२ | ० | माध्य. |
| २७ | मोहराळे, ता. यावल | ओटिएसपी | २६८ | १६४ | ४३२ | १६ | १२ | ४ | १२ | ८ | ४ | प्राथ. |
| २८ | सतखेडा, ता. धरणगांव | ओटिएसपी | ५८६ | ३०३ | ८८९ | ३२ | ३१ | १ | १२ | १२ | ० | क.महा |
| २९ | पिंपळे बु, ता. अमळनेर | ओटिएसपी | ६७१ | ३३४ | १००५ | ३४ | ३४ | ० | १२ | १२ | ० | क.महा |
| ३० | अंतुर्ली, ता अमळनेर | ओटिएसपी | २९२ | १३३ | ४२५ | १६ | १५ | १ | १२ | १२ | ० | माध्य |
| ३१ | पातरखेडा, ता. एरंडोल | ओटिएसपी | २३२ | १५९ | ३९३ | १९ | १५ | ४ | ९ | ६ | ३ | प्राथ |
| ३२ | बिलखेडा, ता. एरंडोल | ओटिएसपी | २६८ | ११२ | ३८० | १६ | १६ | ० | १२ | १२ | ० | माध्य |
| | | | १२१८७ | ७९०७ | २०८९४ | ७०५ | ६४४ | ६१ | ३७८ | ३५० | १८ | |

| | |
|---|---|
| माध्यमिक आश्रमशाळा | :- 20 |
| माध्य.व उच्च माध्यमिक आश्रमशाळा | :- 12 |

**एकुण:- 32**

## ब) स्वंयसेवी संस्थाच्या अनुदानित आश्रमशाळेत कनिष्ठ महाविद्यालय स्थापन करणे

सध्या राज्यात सुरु असलेल्या शासकीय आश्रमशाळा व शासकीय वसतिगृहा व्यतिरिक्त अनुदानित माध्यमिक आश्रमशाळांना संलग्न कनिष्ठ महाविद्यालये सुरु करण्यास शासनाने सन 2003-04 मध्ये मंजूरी दिलेली असून सन 2003-04 पासून 1 कनिष्ठ महाविद्यालय सत्रासेन येथे सुरु करण्यात आलेले होते त्यानंतर 11 ठिकाणी कनिष्ठ महाविद्यालये सरु करण्यांत आली असनु अशी एकुण 12 ठिकाणी अनुदानित आश्रमशाळेत कनिष्ठ महाविद्यालय सुरु करण्यांत आले आहे.

## 4. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, यावल, जि. जळगांव यांचे अधिनस्त कार्यरत शासकीय आश्रमशाळा/ अनुदानित आश्रमशाळा व शासकीय वसतीगृहे.


| अ.क्र. | तालूका | शासकीय आश्रमशाळा | अनुदानित आश्रमशाळा | शासकीय वसतिगृहे |
|---|---|---|---|---|
| १ | यावल | 1. वाघझिरा (क.महा)<br>2. डोंगरकठोरा (माध्य.)<br>3. मालोद (प्राथ.) | 1. मेहराळे( प्राथ.)<br>2. मनवेल (माध्य.)<br>3. जामन्या-गाड्र्या (माध्य.) | 1. यावल (मुलांचे)<br>2. यावल (मुलींचे) |
| २ | रावेर | 1. लालमाती (माध्य.) | 1. रसलपूर (माध्य)<br>2. पिंप्रीमोहगण (माध्य)<br>3. लोहारा (माध्य.)<br>4. मोहमांडली (माध्य.)<br>5. पाल (माध्य.) | 1. रावेर (मुलांचे)<br>2. रावेर (मुलींचे)<br>3. पाल (मुलांचे) |
| ३ | मुक्ताईनगर | 1. जांधनखेडा (माध्य.) | 1. कोथळी (क. महा.) | 1. मुक्ताईनगर (मुलांचे) |
| ४ | बोदवड | 1. पळासखेडा (माध्य.) | ----- | - ------ |
| ५ | जामनेर | 1. गंगापूरी (माध्य.) | ------ | 1. जामनेर (मुलांचे) |
| ६ | एरंडोल | 1. सोनबर्डी (माध्य.) | 1. पातरखेडा (प्राथ.) | 1. एरंडोल (मुलांचे) |
| ७ | धरणगांव | 1. चांदसर (माध्य.) | 1. सतखेडा (क. महा )<br>2.बोरगाव (प्राथ.)<br>3.बिलखेडा(माध्य) | ------- |
| ८ | अंमळनेर | 1. दहिवद (माध्य.)<br>2. पिंगळवाडा (माध्य.) | 1. ताडेपूरा (माध्य.)<br>2. पिंपळे (क. महा.)<br>3. अंतुर्ली (माध्य.) | 1. अंमळनेर (मुलांचे) |
| ९ | चोपडा | 1. वैजापूर (कन्या, माध्य.)<br>2. देवझिरी (माध्य.)<br>3. कृष्णापूर (प्राथ.)<br>4. विष्णापूर (प्राथ.) | 1. बोरअजंटी (क.महा.)<br>2. उमर्टी (माध्य.)<br>3. सनफुले (क.महा)<br>4. हातेड (क.महा)<br>5. सत्रासेन (क. महा.)<br>6. कर्जाणे (क.महा)<br>7. धानोरा (माध्य.) | 1. चोपडा (मुलांचे) जूने<br>2. चोपडा (मुलांचे) नविन<br>3. चोपडा (मुलींचे) |
| १० | भडगांव | --- | 1. पिंपरखेड (माध्य.)<br>2. गुढे ( क.महा.) | --- |
| ११ | पाचोरा | 1. सार्वे (माध्य.) | 1. सातगांव डोंगरी (माध्य.) | ----- |
| १२ | जळगांव | --- | 1. डोमगांव (माध्य.) | 1. जळगांव (मुलांचे) जूने<br>2. जळगांव (मुलांच) नविन<br>3. जळगांव (मुलींचे) जूने<br>4. जळगांव (मुलींचे) नविन |
| १३ | पारोळा | --- | 1. बोळेतांडा (माध्य.)<br>2. तरडी (माध्य.) | ----- |
| १४ | चाळीसगांव | 1. वलठाण (माध्य.) | 1. खडकी(क.महा..)<br>2. देवळी (क.महा)<br>3. मेहुणबारे (क.महा) | 1. चाळीसगाव (मुलांचे) |

1) शासकीय प्राथमिक आश्रमशाळा :- 03
2) शासकीय माध्यमिक आश्रमशाळा :- 12
3) शासकीय कनि.महा.वि आश्रमशाळा :- 02
4) अनुदानित प्राथमिक आश्रमशाळा :- 00
5) अनुदानित माध्यमिक आश्रमशाळा :- 20
6) अनुदानित कनिष्ठ महा.वि.आश्रमशाळा :- 12

## 5. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, यावल, जि.जळगांव प्रकल्प व जिल्ह्यापासून शासकीय आश्रम शाळेपासून प्राथमिक आरोग्य केंद्र व ग्रामीण रुग्णालय अंतर शासकीय आश्रमशाळा

| अ.क्र. | शाळेचे नांव | तालूका | जिल्हा | पेसा क्षेत्र / पेसा क्षेत्राबाहेर | प्राथमिक आरोग्य केंद्र नाव व अंतर | ग्रामीण रुग्णालय नाव व अंतर |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वाघझिरा | यावल | जळगाव | पेसा क्षेत्र | किनगाव 10 कि मी | यावल 25 किमी |
| २ | डोंगरकठोरा | यावल | जळगाव | पे. क्षेत्राबाहेर | भालोद 8 कि मी | यावल 9 कि मी |
| ३ | मालोद | यावल | जळगाव | पेसा क्षेत्र | किनगाव 3 | यावल 18 किमी |
| ४ | वैजापूर | चोपडा | जळगाव | पेसा क्षेत्र | वैजापूर 0 कि मी | चोपडा 22 कि मी |
| ५ | देवझिरी | चोपडा | जळगाव | पेसा क्षेत्र | वैजापूर 17 किमी | चोपडा 48 |
| ६ | कृष्णापूर | चोपडा | जळगाव | पेसा क्षेत्र | लासूर 11 किमी | चोपडा 15 |
| ७ | विष्णापूर | चोपडा | जळगाव | पेसा क्षेत्र | गोरगावले 25 कि मी | चोपडा 15 कि मी |
| ८ | लालमाती | रावेर | जळगाव | पेसा क्षेत्र | लोहारा 12 कि मी | रावेर 12 कि मी |
| ९ | पिंगळवाडे | अमळनेर | जळगाव | पे. क्षेत्राबाहेर | अमळगाव 3 कि मी | अमळनेर 20 कि मी |
| १० | दहिवद | अमळनेर | जळगाव | पे. क्षेत्राबाहेर | दहिवद 0 कि मी | अमळनेर 18 कि मी |
| ११ | चांदसर | धरणगांव | जळगाव | पे. क्षेत्राबाहेर | चांदसर 0 कि मी | धरणगाव 25 कि मी |
| १२ | गंगापूरी | जामनेर | जळगाव | पे. क्षेत्राबाहेर | गारखेडा 3 कि मी | जामनेर 12 कि मी |
| १३ | पळासखेडा | बोदवड | जळगाव | पे. क्षेत्राबाहेर | येवती 5 कि मी | बोदवड -12 कि मी |
| १४ | जोंधनखेडा | मु.नगर | जळगाव | पे. क्षेत्राबाहेर | पारंबी 5 कि मी | क-हा 12 कि मी |
| १५ | वलठाण | 40गांव | जळगाव | पे. क्षेत्राबाहेर | पैंतोडा 18 कि मी | चाळीसगाव 12 कि मी |
| १६ | सार्वे बु | पाचोरा | जळगाव | पे. क्षेत्राबाहेर | नगरदेवळा 15 कि मी | पाचोरा 32 कि मी |
| १७ | सोनबर्डी | एरंडोल | जळगाव | पे. क्षेत्राबाहेर | कासोदा 8 कि मी | एरंडोल 15 कि मी |





## सुवर्ण महोत्सवी पुर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना (Pre Matric)

राज्यात इयत्ता १ ली ते १० वी या वर्गात शिक्षण घेत असलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक खर्च भागविण्याकरिता प्रोत्साहनात्मक योजना दि.३१/५/२०१० रोजीच्या शासन निर्णयानुसार सन २०१०-११ पासुन राज्य शासनामार्फत राबविण्यात येते.

लाभार्थ्यांसाठी अर्हता :

* स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये (जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगर पालिका इ) शिक्षण घेत असलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना योजना लागु आहे.
* शासकीय व अनुदानित आश्रमशाळा, आदिवासी विभागाकडून निधी देण्यात येत असलेल्या सैनिकी शाळा व इंग्रजी माध्यमाच्या नामांकित शाळा यामधील विद्यार्थ्यांना लागु नाही.
* विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु.१.०८ लाखापेक्षा कमी असावे.

## सदर योजने अंतर्गत देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीचे दर खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | इयत्ता | शिष्यवृत्तीचा वार्षिक दर प्रती विद्यार्थी/प्रती विद्यार्थिनी |
|---|---|---|
| 1 | इयत्ता १ ली ते ४ थी | १०००/- |
| 2 | इयत्ता ५ वी ते ७ वी | १५००/- |
| 3 | इयत्ता ८ वी ते १० वी | २०००/- |

*** दि.17/04/2018 रोजीच्या शासन निर्णयान्वये सदर योजना ग्राम विकास विभागाला हस्तांतरीत करण्यात आली आहे**

**(अर्ज कुठे करावा : संबंधित शाळेच्या मुख्यध्यापकाकडे)**



# भारत सरकार शिष्यवृत्ती योजना

**योजनेंचे उद्देश :-**

भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना ही 1959-60 या वर्षापासून केंद्र शासनाकडून राज्यशासनाकडे हस्तातरीत करण्यात आली आहे, या योजनेखाली अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाच्या गटा नुसार निर्वाह भत्ता अदा करण्यात येतो, या बरोबरच शिक्षण फी, परीक्षा फी, वा कनिष्ठ व वरिष्ट महाविद्यालयात देय असलेली सक्तीची इतर फी खर्चाची प्रतिपूर्ती केली जाते.

सदर योजनेखाली विद्यार्थ्यांच्या पालकांची उत्पन्न मर्यादा 2.50 इतकी आहे, सदर योजनेचा लाभ घेणेसाठी विद्यार्थ्यां ने महाडीबीटी पोर्टल वर अर्ज करणे बंधनकारक आहे. आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्र. शिष्यवृत्ती 2021/प्र. क्रं.90/का. 12 दिनांक 17 जानेवारी 2022 योजने तील अटी वा शर्तीच्या अधीन राहून या योजनेचे कामकाज केले जाते.

**अर्ज कुठे करावा :- www.mahadbt.gov.in संबंधीत महाविद्यालयाकडे**







## अनुसूचित जमातीच्या मुला-मुलींना परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना

* परदेशात उच्च शिक्षण घेण्याची संधी लाभलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेणे सोपे व्हावे याकरिता दि.३१/०५/२००५ रोजीच्या शासन निर्णयान्वये परदेशी शिक्षण शिष्यवृत्ती योजना सुरु करण्यात आलेली आहे.
* दि.१६/०३/२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये योजनेअंतर्गत निकषांमध्ये सुधारणा करण्यात आलेल्या आहेत.
* प्रस्तुत योजनेंतर्गत दरवर्षी कमाल १० आदिवासी विद्यार्थ्यांची निवड करण्याची तरतूद आहे.
* व्यवस्थापन, वैद्यकीये अभियांत्रिकी, विज्ञान, कृषी इ. शाखांच्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमां करिता शिष्यवृत्ती देण्यात येते.
* पालकाचे वार्षिक उत्पन्न मर्यादा रु.६.०० लाख असुन विद्यार्थी हा पुर्ण वेळ नोकरी करीत नसावा.
* कुटूंबातील फक्त एकाच अपत्यास या योजनेचा लाभ अनुज्ञेय आहे.
* विद्यार्थ्याने परदेशातील मान्यता प्राप्त विद्यापीठात प्रवेश घेतलेला असावा.
* अभ्यासक्रमाचे शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क व विद्यापीठाने निर्धारीत केलेली इतर शुल्क शिष्यवृत्ती स्वरुपात देण्यात येतात..
* आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांच्यामार्फत दरवर्षी माहे मे महिन्यात वर्तमानपत्रात जाहिरात देऊन इच्छुकांकडून प्रस्ताव मागविण्यात येतात.
* प्रस्तुत शिष्यवृत्ती अंतर्गत प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करण्यासाठी सचिव, आदिवासी विकास यांच्या अध्यक्षतेखाली छाननी समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर समितीत आयुक्त, आदिवासी विकास, आयुक्तालय, नाशिक, अपर आयुक्त, आदिवासी विकास नाशिक, संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई व संचालक वैद्यकीय शिक्षण संचालनालय मुंबई हे सदस्य आहेत, शिष्यवृत्तीचा लाभ मिळविण्यासाठी प्राप्त अर्जाची राज्यस्तरीय छाननी समिती व्दारा पडताळणी होऊन निवड केली जाते व आयुक्तालय स्तरावर शिष्यवृत्ती लाभ मंजुर केला जातो.

# राज्यातील शासन मान्यता प्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित संस्थामधील व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती योजना (FREESHIP)

सदर योजनेची सुरुवात सन २००६-०७ या शैक्षणिक वर्षापासुन झालेली आहे. योजनेस उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडुन दरवर्षी नव्याने मंजुरी देण्यात येत होती, तथापि, सन २०१५-१६ पासुन सदर योजना कायम स्वरुपी योजना म्हणून राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यास अनुसरून आदिवासी विकास विभागामार्फत अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना प्रस्तुत योजने अंतर्गत संबंधित वर्षात शिक्षण शुल्क समिती / प्राधिकरण किंवा परिषदेने निर्धारित केलेल्या दराप्रमाणे शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्काची १००% प्रतिपूर्ती करण्यात येते.

शासन निर्णय क्र व अ प्र२०२०-२१/प्र.क्र.९३/का-१२,दि.१७.०१.२०२२



लाभार्थ्यांसाठीची अर्हता :

१) ज्या विद्यार्थ्यांचे पालकांचे वार्षिक उत्पन्न २५००००/- रु. पेक्षा जास्त आहे ते विद्यार्थी या योजनेस पात्र राहतील.

२) अभियांत्रिकी अभ्यासक्रमाकरीता शात्तनाच्या सामायिक प्रवेश परीक्षेद्वारा प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना लागू राहील.

३) आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाकरीता सामायिक प्रवेश परीक्षेव्दारा प्रवेश घेतलेले खाजगी विना अनुदानित महाविद्यालयाच्या वतीने तसेच असोसिएशन मार्फत घेण्यात येणाऱ्या सामायिक प्रवेश परिक्षेद्वारा आणि इ.१२ वी च्या गुणांच्या आधारे काही अभ्यास क्रमांकरीता (उदा. नर्सिंग) प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना लागु राहील.

४) आरक्षणाचा लाभ न घेता, गुणवत्तेनुसार खुल्या गटातील जागांवर प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना लागु राहील.

५) एक किंवा दोन विषयांमध्ये अनुतीर्ण होऊन ए.टी. के. टी. व्दारे प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना अनुज्ञेय राहील.

६) ज्या अभ्यासक्रमांना केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया लागू आहे त्यांना त्या प्रक्रियेव्दारा प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना लागू राहील.

७) कृषी व संलग्न अभ्यासक्रमांसाठी सी. ई. टी. घेत नसल्यास इयत्ता १२ वी च्या गुणांच्या आधारे प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना लागू राहील.

८) व्यवस्थापन कोट्यातील विद्यार्थी तसेच अभिमत विद्यापीठात प्रवेशितविद्यार्थी यांना अनुज्ञेय नाही.

९) व्यवसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेते वेळेस विद्यार्थ्यांस जात वैधता प्रमाणपत्र असणे बंधन कारक राहील.

# व्यावसायिक अभ्यासक्रमाचे शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता

वैद्यकीय, अभियांत्रिकी, कृषी, पशुवैद्यकीय, वास्तुशास्त्र इ. व्यावसायिक अभ्यासक्रमा तील विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत देण्यात येणारी निर्वाह भत्ता रक्कम अपुरी पडत असल्याने पुस्तके, निवास, भोजन, स्टेशनरी इ. खर्चासाठी वसतिगृहात व वसतिगृहाबाहेर राहणाऱ्या विद्यार्थ्यांना भारत सरकार शिष्यवृत्तीच्या निर्वाह भत्त्याव्यतिरिक्त अतिरिक्त रक्कम या योजनेद्वारे दिली जाते.

**शासन निर्णय : क्र. आवगृ १२०४/प्र.क्र : १८/का १२, दि.२४/०८/२००४**

*** लाभार्थ्यांसाठीची अर्हता :**


१) विद्यार्थी व्यावसायिक पाठ्यक्रमात प्रवेशित असावा.


२) विद्यार्थी भारत सरकार शिष्यवृत्ती धारक असावा.


३) भारत सरकार शिष्यवृत्ती योजनेस जी उत्पन्न मर्यादा लागू आहे. तीच मर्यादा या योजनेस लागू राहिल (रु.२.५० लाख पेक्षा कमी)

४) स्थानिक विद्यार्थी किंवा स्वतःच्या घरी राहणारा विद्यार्थ्यांस सदर योजना लागू आहे.

५) महाविद्यालयाच्या वसतिगृहात किंवा आदिवासी विभागाच्या शासकीय वसतिगृहात विद्यार्थ्यांच्या राहण्याची सोय होत नसल्यास तसे प्रमाणपत्र संबधित वसतिगृह अधीक्षकांकडुन प्राप्त करुन घेणे आवश्यक राहील.








# अनुसूचित जमातीच्या मुला-मुलींसाठी शासकीय वसतिगृह योजना







अनुसूचित जमातीच्या मुला-मुलींना त्यांच्या गावाबाहेर राहुन उच्च शिक्षण घेणे सुलभ व्हावे याकरिता विभागामार्फत विभागिय स्तर, जिल्हास्तर, तालुकास्तर आणि ग्रामिण स्तरावर शासकीय वसतिगृहे कार्यान्वित आहेत.

शासन निर्णय क्र. आवगू-१२०४/प्र.क्र.५२/का-१२ दि.०३/०८/२००४

शासन निर्णय क्र. आवगू-२०११/प्र.क्र.१७१/का-१२ दि.१०/०४/२०१३

सदर वसतिगृहामध्ये जिल्हा स्तरावर इ. ११ वी पासुन व तालुकास्तरावर इ.८ वी पासून पुढील अभ्यासक्रमांसाठी प्रवेश देण्यात येतो.

- प्रवेशित विद्यार्थ्यांस निवास, आहार आवश्यक शैक्षणिक साहित्य सोयी सुविधा मोफत पुरविण्यात येतात.
- योजनेंतर्गत अर्जाकरिता संकेतस्थळ http://swayam.mahaonline.gov.in
- सद्यस्थितीत योजनेंतर्गत १७ शासकीय वसतिगृह कार्यरत असून सन २०२३-२४ मध्ये सुमारे २०२० मुलां-मुलींनी प्रवेश देण्यात येतो. शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांना वस्तु स्वरुपात मिळणारे लाभ तसेच आहार भत्ता रोख स्वरुपात लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बैंक खात्यात थेट जमा करण्याबाबत (DBT)
- तालुकास्तरावरील वसतीगृहामध्ये विद्यार्थ्यांना ठेकेदारी पध्दतीने दुध, नाश्ता, अंडी, केळी, फळ, चिकन, मटन व भोजनाचा पुरवठा केला जातो.

### १) स्टेशनरी व निवासी साहित्यासाठी थेट लाभ:

सर्व स्तरांवरील शासकीय आदिवासी वसतिगृहातील विद्यार्थ्यांना सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून सतरंजी, चादर, बेडशीट, उशी, कव्हर, स्वेटर, वह्या व अभ्यासक्रमांसाठी आवश्यक इतर शैक्षणिक साहित्य, क्रमिक पुस्तके / संदर्भ पुस्तके, छत्री या बाबी वस्तू स्वरूपात देण्याऐवजी, त्याकरिता विद्यार्थ्यांच्या आधार क्रमांक संलग्नित (Linked) बँक खात्यामध्ये रोख रक्कम थेट (Direct) जमा करण्याबाबत दि. ०६/०५/२०१७ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

शासन निर्णय क्र.आब-२०१७/प्र.क्र.१८/का-१२ दि.०६/०५/२०१७

## उपरोक्त वस्तूंकरिता इयत्ता निहाय अभ्यासक्रम निहाय देण्यात येणारी रक्कम

| इयत्ता | रक्कम (रुपयात) |
|---|---|
| ८ वी ते १० वी | ३,२०० |
| ११ वी ते १२ वी व पदविका अभ्यासक्रम | ४,००० |

| इयत्ता | रक्कम (रुपयात) |
|---|---|
| पदवी अभ्यासक्रन (जसे कला/वाणिज्य/विज्ञान/कायदा/कषी.इ.) | ४,५०० |
| वैद्यकीय व अभियांत्रिकी अभ्यासक्रम | ६,००० |

### २) निर्वाह भत्ता - शासकीय वसतिगृहात प्रवेशित विद्यार्थ्यांना देण्यात येणारा निर्वाह भत्ता -

| वसतिगृहाचा प्रकार | निर्वाह भत्ता (रुपयात) |
|---|---|
| विभागीय स्तर | ८०० |

| वसतिगृहाचा प्रकार | निर्वाह भत्ता (रुपयात) |
|---|---|
| जिल्हा स्तर | ६०० |
| तालुका/ग्रामीण स्तर | ५०० |


### ३) भोजन भता -

महानगरपालिका, विभागीय व जिल्हा स्तरावरील शासकीय वसतिगृहात विद्यार्थ्यांना आहाराकरिता आवश्यक रक्कम आधार क्रमांक संलग्रीत बँक खात्यामध्ये बेट जमा करण्याबाबत दि.०५/०४/२०१८ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. योजनेंतर्गत जळगाव शहरातील एकुण ४ वसतीगृहातील सुमारे ९०० विद्यार्थ्यांना लाभ देण्यात येतो.

शासन निर्णय क. आव-२०१८/प्र.क्र.१२/का-१२ दि.०५/०४/२०१८ वसतिगृहनिहाय आहाराकरिता (DBT) निश्चित केलेली रक्कम.

| अ.क्र.वसतिगृह स्तर/दर्जा | मासिक रक्कम रुपये |
|---|---|
| अ.ब व क वर्ग महानगरपालिका विभागीय शहरातील वसतिगृहे | ३,५०० |
| जिल्हास्तरावरील सर्व वसतिगृहे | ३,००० |







# पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयम् योजना

शासन निर्णय क्र. आयगृ-२०१६/प्र.क्र.८७/का-१२ दि.१५/१०/२०१६ सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासुन विभागाच्या कार्यान्वित शासकिय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या एकुण २०००० विद्यार्थी संख्येच्या मर्यादित अनुसुधित जमातीच्या विद्याम्यांना उच्च शिक्षणाकरिता भोजन, निवास व शैक्षणिक साहित्यासाठी त्यांच्या आधारसंलग्न बैंक खात्यामध्ये थेट रक्कम वितरण करण्याबाबत पंडीत दीनदयाल उपाध्याय स्वयम् योजना सुरु करण्यात आलेली आहे. सदर योजनेंतर्गत महानगरपालिका विभागिय शहरे आणि जिल्हास्तरावरील शैक्षणिक संस्था मध्ये प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना निवास, भत्ता, आहार भत्ता तसेच शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून घेण्याकरिता निर्धारित केलेले अर्थसहाय देण्यात येते. सदर विद्यार्थी १२ वी नंतरचे उच्च शिक्षण घेत असावा.

विद्यार्थ्यांस आदिवासी विकास विभागाच्या, सामाजिक न्याय विभागाच्या किंवा संबंधित शैक्षणिक संस्थेच्या वसतिगृहात मोफत प्रवेश मिळालेला नसावा. विद्यार्थी कोणत्याही प्रकारची नोकरी किंवा व्यवसाय करत नसावा. आदिम जातीच्या व अनुसूचित जमातीच्या अपंग विद्यार्थ्यांना सदर योजनेचा लाभ प्राधान्याने देय राहील.

**शासन निर्णय क्र. आवगृ-२०१६/प्र.क्र.८७/का-१२ दि.२७.११.२०१८ सन २०१८-१९**

| खर्चाची बाब | मुंबई शहर, मुंबई उपनगर नवी मुंबई, ठाणे, पुणे, पिंपरी चिंचवड, नागपुर या ठिकाणी उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अनुज्ञेय रक्कम | इतर महसुल विभागीय शहरातील व उर्वरीत क वर्ग महानगरपालिका क्षेत्रा मध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अनुज्ञेय रक्कम | इतर जिल्ह्याचे ठिकाणी उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अनुज्ञेय रक्कम | तालुक्याच्या ठिकाणी उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अनुज्ञेय रक्कम |
|---|---|---|---|---|
| भोजन भत्ता | ३२,००० | २८,००० | २५,००० | ३२,००० |
| निवासी भल्ला | २०,००० | १२,००० | १२,००० | १०,००० |
| निर्वाह भत्ता | ८,००० | ६,००० | ६,००० | ५,००० |
| प्रति विद्यार्थी एकुण संभाव्य वार्षिक खर्च (१० महिने) | ४३,००० | ४३,००० | ४३,००० | ३८,००० |

इ. १२ वी नंतरचे उच्च शिक्षण घेण्याकरिता मोठी शहरे, विभागीय मुख्यालये व जिल्हास्तर अशी वर्गवारी करुन खालील प्रमाणे निश्चित केलेल्या दराने वार्षिक ठोक रक्कम बँक खात्यामध्ये जमा करण्यास मंजुरी दिलेली आहे.

तसेच वरील रक्कमे व्यतीरिक्त वैद्यकीय व आभियांत्रिकी शाखेतील विद्यार्थ्यांसाठी प्रतिवर्ष रु.५,०००/- व अन्य शाखेतील विद्यार्थ्यांना प्रतिवर्ष रु.२,०००/- इतकी रक्कम शैक्षणिक साहित्यासाठी ठोक स्वरुपात देण्यात येते.

**योजनेंतर्गत अर्जाकारिता संपर्क स्थळ: http://swayam.mahaonline.gov.in**



# अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळांमध्ये शिक्षण देणे

जागतिकीकरणाच्या युगात इंग्रजी भाषेचे महत्व विचारात घेऊन अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना देखील इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेणे सोपे व्हावे. तसेच त्यांना इतर प्रवर्गातील विद्यार्थ्यांसोबत इंग्रजी माध्यमातुन शिक्षण घेऊन मुख्य प्रवाहात आणणे या करिता अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळेत शिक्षण देणे ही योजना दि.२८/८/२००९ रोजी च्या शासन निर्णयान्वये सन २०१०-११ या शैक्षणिक वर्षापासुन कार्यान्वित झाली आहे.

**योजनेच्या अटी व शर्ती :**

* विद्यार्थी अनुसूचित जमातीचा असावा, वार्षिक उत्पन्नाची मर्यादा रु.१ लाख असावी.

**योजनेची व्याप्ती व प्रगती:**

* योजने अंतर्गत इयत्ता १ ली व २ री च्या वर्गात विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येतो व १२ वी पर्यंत शिक्षण देण्याची तरतुद आहे.
* शाळा निवडी करिता प्रधान सचिव, आदिवासी विकास, (अध्यक्ष) आणि प्रधान सचिव, वित्त व शालेय शिक्षण (सदस्य) त्रिसदस्यीय समिती आहे.
* योजने अंतर्गत सुरवातीस सन २०१४-१५ पर्यंत विद्यार्थी निवडीचा लक्षांक २५०० इतका होता. * तथापि तत्कालीन मा. मुख्यमंत्री महोदयांनी विभागांच्या आढावा बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार दि.२१/४/२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये लक्षांक दहापटीने वाढवून तो २५०००/- इतका करण्यात आला.
* सन २०१६-१७ पासुन योजनेची अमंलबजावणी करण्यासाठी ऑनलाईन पोर्टल तयार करण्यात आले.
* पुढे दि.१८/५/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये शाळा निवडीकरिता सुधारित निकष निर्गमित करण्यात आले. यामध्ये भौतिक सोयी सुविधा शिक्षणाचा दर्जा, शाळेची शैक्षणिक प्रगती स्वच्छता व सुरक्षितता इत्यादी सर्वंकष निकषांचा समावेश करण्यात आला. या निकषांच्या आधारे शाळेचे गुणांकन दरवर्षी करण्यात येते.
* यामध्ये बिगर नामांकित तसेच नामांकित योजनेंतर्गत प्रवेशित विद्यार्थी यांचे सम प्रमाणात पन्नास पन्नास टक्के असणे अनिवार्य आहे.

# 6. आश्रमशाळेपासून प्राथमिक आरोग्य केंद्र व ग्रामीण रुग्णालय अंतर- अनुदानित आश्रमशाळा

| अ.क्र. | शाळेचे नांव | तालूका | जिल्हा | पेसा क्षेत्र / पेसा क्षेत्राबाहेर | प्राथमिक आरोग्य केंद्र नाव व अंतर | ग्रामीण रुग्णालय नाव व अंतर |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मोहराळा | यावल | जळगाव | पेसा क्षेत्राबाहेर | सावखेडा 8 किमी | यावल 15 किमी . |
| २ | मनवेल | यावल | जळगाव | पेसा क्षेत्राबाहेर | साकळी 3 किमी | यावल 15 किमी . |
| ३ | जामण्यागाड्र्या | यावल | जळगाव | पेसा क्षेत्र | जामन्या 0 किमी | पाल 20 किमी . |
| ४ | पाल | रावेर | जळगाव | पेसा क्षेत्र | पाल 0 किमी | पाल 0 किमी . |
| ५ | पिंप्री-मोहगण (मंगरुळ) | रावेर | जळगाव | पेसा क्षेत्राबाहेर | वाघोड 10 किमी | रावेर 12 किमी . |
| ६ | लोहारा | रावेर | जळगाव | पेसा क्षेत्र | लोहारा 0 किमी | रावेर 15 किमी . |
| ७ | रसलपूर | रावेर | जळगाव | पेसा क्षेत्र | ऐनपूर 18 किमी | रावेर 4 किमी . |
| ८ | गौरखेडा | रावेर | जळगाव | पेसा क्षेत्राबाहेर | लोहारा 0 किमी | रावेर 15 किमी . |
| ९ | मोहमांडली | रावेर | जळगाव | प्पेसा क्षेत्र | खिरोदा 30 किमी | न्हावी 20 किमी . |
| १० | सत्रासेन | चोपडा | जळगाव | पेसा क्षेत्र | लासूर 8 किमी | चोपडा 35 किमी . |
| ११ | उमर्टी | चोपडा | जळगाव | पेसा क्षेत्र | लासूर 35 किमी | चोपडा 50 किमी . |
| १२ | बोरअजंटी | चोपडा | जळगाव | पेसा क्षेत्र | वैजापूर 10 किमी | चोपडा 11 किमी . |
| १३ | धानोरा | चोपडा | जळगाव | पेसा क्षेत्राबाहेर | धानोरा 0 किमी | चोपडा 25 किमी . |
| १४ | कर्जाणा | चोपडा | जळगाव | पेसा क्षेत्र | वैजापूर 7 किमी | चोपडा 27 किमी . |
| १५ | हातेड | चोपडा | जळगाव | पेसा क्षेत्राबाहेर | हातेड 0 किमी | चोपडा 12 किमी . |
| १६ | सनफुले | चोपडा | जळगाव | पेसा क्षेत्राबाहेर | चहार्डी 10 किमी | चोपडा 12 किमी . |
| १७ | कोथळी | मु.नगर | जळगाव | पेसा क्षेत्राबाहेर | कोथळी 0 किमी | मु.नगर 1 किमी . |
| १८ | सातगाव (डों) | पाचोरा | जळगाव | पेसा क्षेत्राबाहेर | वरखेडी 15 किमी | पिंपळगाव 13 किमी . |
| १९ | पिपंळे | अमळनेर | जळगाव | पेसा क्षेत्राबाहेर | जानवे 8 किमी | अमळनेर 6 किमी . |
| २० | ताडेपुरा | अमळनेर | जळगाव | पेसा क्षेत्राबाहेर | जानवे 13 कि.मी | अमळनेर 2 किमी . |
| २१ | अतुर्ली | अमळनेर | जळगाव | पेसा क्षेत्राबाहेर | मारवड 6 किमी . | अमळनेर 8 किमी .. |
| २२ | डोमगांव | जळगांव | जळगाव | पेसा क्षेत्राबाहेर | म्हसावद 5 किमी | जळगाव 20 किमी |
| २३ | सतखेडा | धरणगांव | जळगाव | पेसा क्षेत्राबाहेर | सोनवद 5 किमी | धरणगांव 12 किमी |
| २४ | बोरगांव | धरणगांव | जळगाव | पेसा क्षेत्राबाहेर | साळवा 20 किमी | धरणगांव 9 किमी |
| २५ | गुढे | भडगांव | जळगाव | पेसा क्षेत्राबाहेर | गुढे 3 किमी . | भडगांव 23 किमी |
| २६ | पिपंरखेड | भडगांव | जळगाव | पेसा क्षेत्राबाहेर | पिपरखेड 0 किमी . | भडगांव 13 किमी . |
| २७ | मेहुणबारे | 40 गांव | जळगाव | पेसा क्षेत्राबाहेर | मेहूणबारे 0 किमी . | 40गांव 12 किमी |
| २८ | गवेळी | 40 गांव | जळगाव | पेसा क्षेत्राबाहेर | उबरखेड 6 किमी .. | 40गांव 11 किमी . |
| २९ | खडकी | 40 गांव | जळगाव | पेसा क्षेत्राबाहेर | तळेगांव 3 किमी . | 40गांव 7 किमी . |
| ३० | बोळेतांडा | पारोळा | जळगाव | पेसा क्षेत्राबाहेर | तामसवाडी 5 किमी . | पारोळा 16 किमी . |
| ३१ | तरडी | पारोळा | जळगाव | पेसा क्षेत्राबाहेर | तामसवाडी 6 किमी .. | पारोळा 12 किमी . |
| ३२ | पातरखेडा | एरंडोल | जळगाव | पेसा क्षेत्राबाहेर | एरंडोल 5 किमी . | एरंडोल 5 किमी . |
| ३३ | बिलखेडा | धरणगाव | जळगाव | पेसा क्षेत्राबाहेर | ढेकू 10 कि.मी. | धरणगाव 15 कि.मी. |



## 10. अनु. जमातीच्या विद्यार्थ्यांना सैनिकी शाळेत शिक्षण देणे-

अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना सैनिकी शाळांमध्ये शिक्षण मिळून पुढे राष्ट्रीय संरक्षण प्रबोधीनीमध्ये प्रवेश मिळावा या हेतूने प्रकल्पांतर्गत जळगाव जिल्ह्यातील अनु. जमातीच्या विद्यार्थ्यांना सैनिकी प्रशिक्षण देणेसाठी विजयनाना पाटील आर्मी स्कूल, अमळनेर येथे इ. 6 वी पासून 45 विद्यार्थ्यांची एका तुकडीस मंजुरी प्राप्त आहे. सदर विद्यार्थ्यांना इ.6 वी पासून 12 वी पर्यंत इतर शिक्षणासोबत सैनिकी शिक्षण विनामुल्य दिले जाते. तसेच निवास, भोजन, गणवेश, स्टेशनरी साहित्य व सैनिकी शिक्षण दिले जाते. सन 2025-26 मध्ये 246 विद्यार्थी प्रवेशित आहेत.



## 2) केंद्र शासन सहाय्यक योजना (विकेंस)

सेवा क्षेत्र, बाधित क्षेत्र व तत्सम बाबीतील उणिवा भरुन काढण्यासाठी राज्याच्या योजनेस पूरक म्हणून सदर योजना राबविण्यात येतात. त्यामध्ये क्षेत्रविकास व व्यक्तिविकास हे दोन मुलभूत घटक येतात.

या योजनाअंतर्गत खालीलप्रमाणे विकास शीर्ष अंतर्गत विविध विकास योजना राबविण्यात येतात.

| अ.क्र. | केंद्र शासन योजना | घटक कार्यक्रम | | |
|---|---|---|---|---|
| १ | विशेष केंद्रीय सहाय्य | कौशल्य विकसीत करण्यासाठी प्रशिक्षण, पाणलोट क्षेत्रावर आधारित उत्पन्न वाढीच्या योजना, साठवण तंत्र (स्टोरेज टेक्नॉलॉजी) इ. | | |
| २ | प्रधानमंत्री आदि आदर्श ग्राम योजना | एकूण मंजुर गावे | 67 | |
| | | एकूण मंजुर कामे | 148 | |
| | | एकूण प्रशासकीय मान्यता दिलेली कामे | 22 | |
| | | निधी वितरण केलेली रक्कम | 192.00 | रुपये लाखात |
| | | योजनेचे नाव | कामाची संख्या | तरतूद |
| | | Digitization of Anganwadi and Z.P. School | 28 | 199.50 |
| | | Start Anganwadi | 39 | 407.00 |
| | | Construction of Public Toilet | 28 | 227.00 |
| | | Construction of Public Road | 20 | 111.00 |
| | | Construction of Internal Road | 05 | 46.00 |
| | | Build Protection Wall | 01 | 6.00 |
| | | Construction of Confined concrete or Pipe Sewers | 16 | 165.99 |
| | | Construction of Road to Villiage | 08 | 68.00 |
| | | Construction of Gram Panchayat | 01 | 20.00 |
| | | To Bore | 02 | 08 |
| | | | 148 | 1258.49 |

# 4) ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा योजना-



1) शासननिर्णयक्र.आवसू-2006/प्र.क्र.72/का.14 मंत्रालय मुंबई-32 दिनांक 26/06/2007

तसेच शासननिर्णयक्र. ठबायो-2021/ प्र.क्र.15/का.9 दिनांक 3 फेब्रुवारी,2023

उक्त शासन निर्णयांच्या आधारे आदिवासी लोकांच्या भौतीक गरजा भागविण्यासाठी ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजना आदिवासी विकास विभागामार्फत राबविली जाते. सदर योजनेनुसार संबधीत ग्रामपंचायतीचे मागणीपत्र ठराव, नाहरकत दाखले, सदर काम या आधी झाले नसल्याबाबतचे प्रमाणपत्र, लोकसंख्याचा दाखला या सर्वाच्या आधारे खालील प्रमाणे कामे प्रशासकीय मान्यतेकरिता सादर केले जातात.

१) मुख्यवस्ती पर्यंत जोडरस्ते/अंतर्गतरस्ते (सिमेंट कॉक्रीटीकरण/डांबरीकरण)

२) पिण्याच्या शुध्द पाण्याची सोय,पाणी पुरवठा योजना/विहीर/हौद /बोअरवेल इ.

३) बंद गटार बांधणे, नाल्याच्या मो-या बांधणे.

४) आदिवासी वस्तीचे विद्युतीकरण, मार्गदिप बसविणे.

५) समाजमंदीर बांधणे, मंगलकार्यालय, वाचनालय, व्यायमशाळा बांधणे.

६) स्मशानभुमी बांधकाम करणे.

७) नदीकाठी संरक्षक भिंत, नदीकाठी घाट बांधणे.

८) तिर्थक्षेत्र व पर्यटन विकास

९) ग्रामपंचायत कार्यलय, ग्रामसचिवालय (100 टक्के आदिवासी ग्रामपंचायत )

सदर कामे ही आदिवासी लोकसंख्येच्या प्रमाणनुसार ठरविली जातात.

अ) 1 ते 100 पर्यंत लोकसंख्या प्रती काम रू.5.00 लक्ष.

ब) 101ते 499 पर्यंत लोकसंख्या प्रती काम रू.20.00 लक्ष

क) 500 ते 999 पर्यंत लोकसंख्या प्रती काम रू.40.00 लक्ष

ड) 1000 ते1499 पर्यंत लोकसंख्या प्रती काम रू.50.00 लक्ष

इ) 1500 ते 3000 पर्यंत लोकसंख्या प्रती काम रु.75.00 लक्ष

उ) 3000 पेक्षा जास्त रू.100.00 लक्ष















## 5) कन्यादान योजना-

लग्न समारंभाच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणावर होणारा खर्च कमी करण्यासाठी आणि विवाह सोहळ्यातील अनुचित प्रथांना आळा घालण्यासाठी सामुहिक विवाह सोहळ्यांना प्रोत्साहन देवून अशा विवाह सोहळ्यांमध्ये सहभागीय होणा·या अनुसूचित जमातीच्या दाम्पत्यांना आर्थिक सहाय्य म्हणून रु. 25,000-/ चा धनादेश वधु व वराच्या संयुक्त नावाने देण्यात येतो.

- वर किंवा वधु अनुसूचित जमातीचा असणे आवश्यक आहे.
- विवाह नोंदणीनुसार वराचे वय 21 वर्षे व वधुचे वय 18 वर्षे पूर्ण असणे आवश्यक आहे.
- वर आणि वधुचा प्रथम विवाह असणे आवश्यक.
- जिल्हा माहिती व जनसंपर्क यंत्रणेकडून योजनेची प्रसिद्धी देणे.
- सेवाभावी संस्था/ सरकारी यंत्रणा/ प्रकल्प अधिकारी यांचेमार्फत योजना राबविण्यात येते.



## 6) भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना-

अनुसुचित क्षेत्रातील गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांना एक वेळचा सकस आहार स्त्री गरोदर असल्याचे निश्चित झाल्यापासून बाळंतपणापर्यंत तसेच स्तनदा मातांना पहिले सहा महिनेसाठी एक वेळ दिला जातो. सदर आहार अंगणवाड्यामार्फत दिला जातो. एक वेळच्या पुर्ण आहारामध्ये- चपाती / भाकरी, भात, कडधान्ये-डाळ, सोया दुध (साखरेसह), शेगदाणा लाडू (साखरेसह), अंडी/ केळी/ नाचणी हलवा, फळे, हिरव्या पालेभाज्या, खाद्यतेल, गुळ/ साखर, आयोडीनयुक्त मीठ, मसाला इ.चा समावेश होतो.









## 7) भूमिहीन दारिद्र्य रेषेखालील आदिवासीचे सबळीकरण व स्वाभिमान योजना

भूमिहीन दारिद्र्य रेषेखालील आदिवासींचे उत्पन्नाचे स्त्रोत वाढावे व त्यांच्या राहणीमानात बदल व्हावा याकरिता त्यांचे मजूरीवर असलेले अवलंबित्व कमी होऊन त्यांना कायमस्वरूपी उत्पन्नाचे साधन उपलब्ध होणे आवश्यक असल्याने, दिनांक 28 जुलै 2021 च्या शासन निर्णयान्वये 4 एकर जिरायती (कोरडवाहू) किंवा 2 एकर बागायती (ओलिताखालील) जमिनीपेक्षा जास्तीत जास्त 20 गुंठे पर्यंत अधिक शेतजमीन खरेदी करून 100 टक्के अनुदानावर अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना शेतजमीन वितरीत करण्यात येते.

# 8) शबरी घरकुल योजना-



1) आदिवासी विकास विभाग शासन निर्णय दिनांक 28 मार्च 2013 अन्वये प्रति घरकुल बांधकामाचे चटई क्षेत्र किमान 269 चौरस फुट आहे.

2) आदिवासी विकास विभाग शासन निर्णय दिनांक 06 जानेवारी 2017 अन्वये शबरी आदिवासी घरकुल योजनेअर्तगत ग्रामीण भागाकरीता प्रति घरकुल साधारण क्षेत्र रुपये 1.20000/- व नक्षल ग्रस्त व डोगराड भागासाठी रुपये 1.30000 प्रमाणे लाभार्थ्यांना अनुदान अनुज्ञेय आहे. तसेच शैचालय बांधण्यासाठी रुपये 12000 ची प्रतिपुर्ती पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने करावी असा निर्णय आहे.

3) आदिवासी विकास विभाग शासन निर्णय घरकुल 2016/प्र.क्र 37/का 17 दिनांक 15 मार्च 2016 अन्वये मा. मुख्य कार्यकारी अधिकारी अध्यक्ष असुन ग्राम सभेमार्फत प्रात्र लाभार्थ्यांची निवड करुन घरकुलाचा लाभ देण्यांत येतो. प्राप्त लक्षांकाची रक्कम राज्य व्यवस्थापन कक्षाकडे वर्ग केली जाते.

4) ग्रामविकास विभाग शासन निर्णय दिनांक 14 जुलै 2017 अन्वये पंडित दिनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी आर्थ साहाय्य योजना सुरु करण्यांत आली आहे. राज्यपुरस्कुत ग्रामीण घरकुल योजनेतील घरकुल पात्र परंतु घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध नसलेल्या कुटुबांना जागा खरेदी करण्यासाठी रुपये 50,000 पर्यत अर्थसहाय्य करुन देण्यांत येईल आसा निर्णय घेण्यांत आला.

5) आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्रमांक आविवि-0323/प्र.क्र.57/का-8 दिनांक 25 एप्रिल 2023 अन्वये ग्रामीण क्षेत्रातील लाभार्थ्यांची निवड करण्याकरीता समिती पुनर्रचना करण्यांत आलेली आहे.

शबरी घरकुल योजनेअर्तगत देण्यांत आलेले लाभ.


| अ.क्र. | वर्षे | मंजुर लक्षांक | मंजुर करण्यांत आलेले लाभ | पुर्ण झालेले | काम प्रगती पथावरील घर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2022- 23 | 3040 | 2976 | 2972 | 4 | 3650.40 |
| 2 | 2023- 24 | 6301 | 6301 | 1063 | 5238 | 69.36.00 |

# जिल्हा वार्षिक आदिवासी घटक कार्यक्रम सन २०२४-२५


## दिनांक ३१ मार्च २०२५ अखेर झालेल्या खर्चाचा तपशील

| अ.क्र. | बाब | आदिवासी उपयोजना TSP | आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील OTSP | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | मंजूर नियतव्यय | 23.63 | 32.29 | 55.92 |
| २ | सुधारीत तरतूद | 24.04 | 31.88 | 55.92 |
| ३ | प्राप्त निधी | 24.04 | 31.88 | 55.92 |
| ४ | यंत्रणांना वितरित केलेल्या निधी | 24.04 | 31.88 | 55.92 |
| ५ | ३१ मार्च २०२५ अखेर झालेला एकूण खर्च | 24.04 | 31.88 | 55.92 |
| ६ | वितरित तरतुदीशी खर्चाची टक्केवारी | 100% | 100% | 100% |

मंजूर नियतव्यय




सुधारीत तरतूद





प्राप्त निधी




यंत्रणांना वितरित केलेल्या निधी





३१ मार्च २०२५ अखेर झालेला एकूण खर्च




वितरित तरतुदीशी खर्चाची टक्केवारी





# वनहक्क कायदा

वनहक्क कायदा अशा वननिवासी अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी करिता केला गेला आहे ज्यांचे वास्तव्य पिढ्यानपिढ्या जंगलात असूनही त्यांच्या हक्कांची कोणत्याही प्रकारची नोंद घेतली गेली नाही आणि अधिकारांना मान्यता दिली गेली नाही, असे वनहक्क न्याय्यपणे नोंदवून त्याचे अभिलेख तयार करण्याची रचना निर्माण करून त्यासाठी आवश्यक अशा विविध पुराव्यांचे स्वरूप सुनिश्चित हमी हा कायदा देतो.

अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम 2006 मधील कलम 3(1) अंतर्गत जळगाव जिल्ह्यातील जिल्हास्तरीय समितीने 2125 वैयक्तिक वनहक्क दावे मान्य केले असून त्यामध्ये 3163 हेक्टर आर इतके वनक्षेत्र समाविष्ट आहे.

अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम 2006 मधील कलम 3(2) अंतर्गत जळगाव जिल्ह्यातील जिल्हास्तरीय समितीने 196 वन गावांना सामुहिक वनहक्क देण्यात आले आहे. त्यामध्ये 29169 हेक्टर आर इतके वनक्षेत्राचा समावेश आहे.







## वनहक्क लाभार्थ्यांना होणारे फायदे :-

- आदिवासींचे स्थलांतर थांबवून त्यांच्या जिवनाला स्थैर्य प्राप्त झाले आहे.

- मंजूर वनहक्क लाभार्थ्यांच्या नोंदी गा.न.नं. 7/12 च्या इतर अधिकारात फेरफार नोंदीव्दारे घेण्यात येत आहेत. त्यामुळे वनहक्क लाभार्थ्यांना बँक कर्ज घेता येत आहे. तसेच शासनाच्या विविध शेती पुरक योजनांचा लाभ घेता येत आहे.

| जिल्हा | दाव्याचा प्रकार | मान्य दावे संख्या | टायटल वाटप संख्या | 7/12 वाटप दावे | कंपार्टमेंट केसेस | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| जळगाव | वैयक्तिक | 2125 | 2125 | 189 | 1936 अनुसूची जे वाटप | |
| | सामुहिक | 196 | 196 | - | - | |



# पंचायत क्षेत्र विस्तार कायदा, 1996 (पेसा) बाबत माहिती

## जळगाव जिल्ह्यातील अनुसूचित क्षेत्रातील पेसा घोषित गावे, पाडे व सन 2011 च्या जनगणनेनुसार लोकसंख्या बाबत माहिती

| अ.क्र. | तालुका | ग्रामपंचायत संख्या | पेसा घोषित गावांची/ पाड्यांची संख्या | एकूण लोकसंख्या | अनुसूचित जमाती लोकसंख्या | अनुसूचित जमाती टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | चोपडा | 15 | 43 | 36847 | 33403 | 90.65 |
| 2 | यावल | 6 | 21 | 15456 | 13984 | 90.48 |
| 3 | रावेर | 13 | 29 | 35495 | 23953 | 67.48 |
| | एकूण | 34 | 93 | 87798 | 71340 | 81.25 |





- पेसा कायदा अंमलबजावणी यंत्रणा जिल्हा परिषद असून, जिल्हा वार्षिक आदिवासी घटक कार्यक्रम अंतर्गत उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) जिल्हा परिषद, जळगाव यांना पेसा ग्रामपंचायतींना 5% निधी वितरीत करणेकामी दरवर्षी 03 कोटी 40 लाख निधी देण्यात येतो.

- वनहक्क कायद्यांतर्गत मंजूर एकूण 2125 वैयक्तिक वनहक्कधारक लाभार्थ्यांपैकी पेसा क्षेत्रातील 1936 लाभार्थ्यांना वैयक्तिक वनहक्क (IFR) मंजूर करण्यात आले आहेत.

- पेसा गावांतील अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांपैकी सन 2023-24 मध्ये 1360 लाभार्थ्यांना घरकुल योजनेचा लाभ दिलेला आहे.

- केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजने अंतर्गत पेसा क्षेत्रातील 2439 लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे.



# प्रधानमंत्री आदि आदर्श ग्राम विकास योजना

**योजनेंचे उद्देश :-**

विशेष केंद्रीय सहाय्य अंतर्गत अनुदान, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५ (१) अंतर्गत व आदिम जमाती विकास कार्यक्रम या योजनेंअंतर्गत राज्य शासनास अनुदान प्राप्त होत असते. आता केंद्र शासनाने सद्यस्थितीत अस्तित्वात असलेल्या विशेष केंद्रीय सहाय्य योजनेचे (Special Central Assistance to Tribal Sub-Scheme) स्वरुप बदलून अनुसूचित जमातीची लोकसंख्या असलेल्या गावांचा आदर्श गाव संकल्पनेवर आधारित एकात्मिक सामाजिक व आर्थिक विकास करण्यासाठी प्रधानमंत्री आदि आदर्श ग्राम विकास योजना (PMAAGY) ही योजना सुरु करण्याचा निर्णय घेतलेला आहे सदर योजनेद्वारे विविध क्षेत्र जसे की, शिक्षण आरोग्य सेवा, दळणवळण, पायाभुत सुविधा, उपजिविका इ. मध्ये केंद्र व राज्य शासनाच्या इतर मुख्य योजनांमधुन राहत असलेली कमतरता दुर करण्याचे उदिष्ट आहे. त्या अनुषगांने अनुसूचित जमातीची लक्षणीय लोकसंख्या असलेल्या गावांचा आदर्श गाव संकल्पनेवर आधारीत एकात्मिक सामाजिक व आर्थिक विकास होण्याच्या हेतुने प्रधानमंत्री आदि आदर्श ग्राम विकास योजना (PMAAGY) ही योजना राबविण्यासाठी मंजुरी प्रदान करण्यात आलेली आहे.

---

**ग्राम विकास आराखडा तयार करणे व त्यास मान्यता देणे.**

गावकऱ्यांच्या सक्रीय सहभागातुन आणि ग्रामसभेच्या / पंचायतीच्या मान्यतेने ग्राम विकास आराखडा तयार करण्यात येतो.

---

१) रस्ते (गावांर्तगत व गावांना जोडणारे) २) दुरसंचार सुविधा ३) अंगणवाडी केंद्र ४) आरोग्य उपकेंद्रे ५) पिण्याच्या पाण्याची सुविधा ६) गटारे व मल व्यवस्थापन ७) या सोबतच कौशल्य वृध्दी कार्यक्रम, समुदाय व वन विकास, वनधन कार्यक्रम, जल खोतांचे संरक्षण यांचा समावेश करण्यात येईल. ८) ग्राम विकास आराखडा हा गावाच्या गरजा व क्षमतेच्या आधारावर तयार करण्यात येईल ९) ग्राम विकास आराखड्यांना प्रकल्प स्तरावरील समिती मान्यता देते.

# प्रधानमंत्री वन धन विकास योजना

### वन धन योजनेंचा उद्देश :-

प्रधानमंत्री वन धन विकास केंद्र ही योजना केंद्र शासनाने कार्यान्वित केली आहे भारतीय राज्य घटनेच्या पाचव्या अनुसूचित नमूद केलेल्या महाराष्ट्रातील अनुसूचित क्षेत्र व इतर क्षेत्रामधील स्वंयसहायता गटातील सदस्यामार्फत गौण वनोउपज गोळा करणे गोळा केलेल्या गौण वनोउपजाचे मुल्यवर्धन करुन विक्री करणे, या योजने अंतर्गत आदिवासी क्षेत्रातील आदिवासी कुटुंबाचे स्वंयसहायता गट स्थापन करणे व झालेल्या विक्रीचा नफा मुळ गौण वनोउपज गोळा करणाऱ्या आदिवासी लाभार्थ्यांला मिळवून देणे तसेच जंगलात निर्माण होणाऱ्या गौण उपजावर आदिवासींच्या परंपरागत ज्ञानाचा, कौशल्याचा तसेच आधुनिक माहिती तंत्रज्ञानाथा उपयोग करून गौण वनोउपजावर प्रक्रिया करणे व त्यांचे मुल्यसंवर्धन करुन त्या विक्रीपासून मिळणाऱ्या नफ्याद्वारे आदिवासींचे जीवनमान उंचावणे हा योजनेंचा मुख्य उद्देश आहे.

### योजनेंचे स्वरुप :-

भारतीय जन जाती सहकारी विपणन संघ मर्यादित (ट्रायफेड) नवी दिल्ली यांची महाराष्ट्रात अनुसूचित क्षेत्रातील अनुसूचित जमाती मधील स्वंयरहायता बचत गटाच्या सहाय्याने त्यांचे क्षेत्रात मोठ्या प्रमाणात प्राप्त होणाऱ्या गौण वनोउपज व इतर बाबींवर मुल्यवर्धन करून त्यांची विक्री करण्यासंदर्भात २२० वनधन विकास केंद्र समुह स्थापित करण्याचे उदिष्ट निश्चित केले आहे.

### वन धन विकास केंद्र स्थापन करणे :-

१) जवळच्या भौगोलिक क्षेत्रातीत जास्तीत जास्त २० लाभार्थी मिळून १ स्वंययहायता गट (SGH) असे १५ स्वयंसहायता बचत गट मिळून १ वनधन विकास केंद्र समुह स्थापन करण्यात येईल. स्वयंसहायता गट हा गाव पातळीवरील अथवा आजुबाजुच्या गांवातील असावे. स्वयंसहायता गटास वन धन बचत गट असे संबोधण्यात येईल. २) स्वयंसहायता गटामध्ये जास्तीत जास्त २० लाभार्थी मिळून १ वन धन बचत गट (SGH) तयार करावे ज्यात कमीत कमी ८०% पेक्षा जास्त लाभार्थी अनुसूचित जमातीचे राहतील. ३) महिला आर्थिक विकास महामंडळ (मा.वि.म.) पेसा किंवा वनहक्क कायदा अंतर्गत ग्रामसभेच्या मान्यतेने स्थापन केलेली समिती किंवा स्वतः ग्रामसभा, आदिवासी सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोप्रती अभियान (MSRLM) व स्वयंसेवी संस्था (NGO) यांचे अस्तित्वात असलेले स्वयंसहायता गट हे वन धन बचत गटाचे कार्य करू शकतात. ४) बन धन बचत गटातील (SGH) सदस्याचे किमान वय १८ वर्षे असणे आवश्यक आहे. ५) वन धन विकास केंद्र समुहाच्या व्यवस्थापन समिती मध्ये प्रत्येक स्वयंसहायता गटाचा १ प्रतिनिधी असणे अपेक्षित राहील व त्यामधुन वन धन केंद्र समुहाचा अध्यक्ष व सचिव निवडला जाईल. अध्यक्ष व सचिव है अनुसूचित जमातीचे असणे आवश्यक राहील. ६) प्रत्येक वन धन केंद्र समुहात कमीत कमी ३०० लाभार्थी असणे आवश्यक आहे.

वन धन विकास केंद्राने पहिला टप्पा यशस्वीरित्या पुर्ण केल्यानंतर दुसऱ्या टप्पामध्ये वनधन विकास केंद्राचे बळकटीकरण करण्यासाठी रु.२०.०० लक्ष (रुपये वीस लाख फक्त) इतका निधी केंद्र शासना मार्फत उपलब्ध करून देण्यात येईल.





# केंद्रवर्ती अर्थसंकल्प (न्युक्लिअस बजेट) योजना

- शासन निर्णय क्र. न्युबयो २०११/प्र.क्र.८७/का.७ दि.२१/६/२०१३ अन्वये सुधारीत शासन निर्णय निर्गमीत करण्यात आलेला आहे. प्रस्तुत योजना प्रामुख्याने आदिवासी व्यक्ती व कुटूंब केंद्र बिंदु मानून त्यांचे जीवनमान उंचविण्याच्या दृष्टीने निर्माण करण्यात आलेली आहे.
- प्रस्तुत योजना प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प ह्यांचे मार्फत आणि अपर आयुक्त आदिवासी विकास यांचे नियंत्रणाखाली राबविण्यात येत आहे
- ज्या योजना आदिवासी विकास किंवा कल्याणाच्या दृष्टीने स्थलकालानुरुप आवश्यक आहेत आणि ज्या योजनांचा समावेश अर्थ संकल्पात नाही अशा अभिनव स्वरुपाच्या स्थानिक महत्वाच्या योजना तांत्रिक औपचारिकतेमुळे दीर्घ कालावधीकरीता अडकुन न पड़ता स्थानिक पातळीवर तातडीने आणि प्रभावीपणे कार्यान्वित करुन त्यांचा लाभ गरजु आदिवासींना प्रत्यक्ष मिळवून देणे हा योजनेचा गाभा आहे. तथापि या योजनेमध्ये लाभार्थींना कर्ज अपेक्षित नाही.
  न्युक्लिअस बजेट योजनेंतर्गत प्रत्येक आदिवासी व्यक्तीस / कुटूंबांस लाभाची आर्थिक मर्यादा रु.५०,०००/- असेल व बचत गटाकरिता कमाल मर्यादा रक्कम रु. ८,००,०००/- अनुदान मंजुर करण्यात येईल.

- **अ गट: उत्पन्न वाढीच्या/उत्पा निर्मितीच्या योजना**
- लाभार्थी अनुसूचित जमातीचा असावा, या योजने अंतर्गत २५,०००/- ते ५०,०००/- पर्यंत लाभ दिला जातो. (आदिवासी जमातीच्या सुशिक्षित बेरोजगार लाभार्थ्यांना ८५% अनुदानावर विविध व्यवसाय करण्यासाठी अर्थ सहाय्य करणे)
- बचत गटांसाठी कमाल मर्यादा रक्कम रु. ८,००,०००/- तथा शासन निर्णयात नमुद केल्यानुसार अनुदान देण्यात येते. (आदिवासी बचत गटाना व्यवसायाकरिता ८५% अनुदान देणे)

- **क गट: मानवी कल्याणाच्या योजना**
- आदिवासी जमातीवर झालेल्या अत्याचार ग्रस्ताला ५०,०००/- पर्यंत अर्थसहाय करण्यात येते.

**अटी व शर्ती:-**

साभार्थी अनुसूचित जमातीचा असावा, ग्रामसभा / नगरपालिका ठराव, जातीचा दाखला, रहिवासी दाखला, दारिद्र्य रेषेखाली, तहसीलदाराचा उत्पन्न दाखला, रेशन कार्ड, आधार कार्ड, मतदान कार्ड मोबाईल क्र. या पुर्वी योजनेचा लाभ घेतला नसल्याचा दाखला, राष्ट्रीयकृत बँक खाते पासबुक, कागदपत्र, सेवा योजना कार्ड, बचत गटांच्या योजनांकरिता नोंदणी प्रमाणपत्र, बँक खाते, १०० रु.च्या बॉन्ड पेपरवर हमीपत्र तसेच बचतगटातील सर्व सदस्य आदिवासी जमातीचे हवे.

